रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २०७
www.ramprahar.com
बुधवार, १२ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

'मुंबई-पुणे मिसिंग लिंक लवकरात लवकर पूर्ण करा'/२
नवी मुंबई बनणार जागतिक शैक्षणिक केंद्र/६
जिम्नॅस्टिक्समध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंचा 'सुवर्ण' षटकार/८

## धारातीर्थ गडकोट मोहिमेचा किल्ले रायगडावर समारोप



**महाड :** किल्ले रायगडावरील शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या धारातीर्थ गडकोट मोहिमेचा समारोप मंगळवारी (दि.११) रोजगार हमी, फलोत्पादनमंत्री भरत गोगावले आणि शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे प्रमुख संभाजी भिडे यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी पश्चिम महाराष्ट्रातील आमदार सर्वश्री अशोक माने, सुधीर गाडगीळ, शंकर मांडेकर, अमोल जावळे, अनुप राव अग्रवाल तसेच केतकी पाटील यांच्यासह प्रतिष्ठानचे महाराष्ट्र अध्यक्ष रावसाहेब देसाई आदी उपस्थित होते. मंत्री गोगावले यांनी किल्ले रायगडावर छत्रपती शिवरायांचे सोन्याचे सिंहासन निर्माण करण्याकरता आवश्यक असलेली सर्व मदत करण्याची ग्वाही देऊन आपण यासाठी वचनबद्ध असल्याचे जाहीर केले.

# राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात उमेद मॉल उभारणार –मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

'महालक्ष्मी सरस' हा अत्यंत लोकप्रिय उपक्रम झाला आहे. राज्यभरातील बचत गटांना हक्काचे विक्रीचा साधन उपलब्ध व्हावे यासाठी प्रायोगिक तत्त्वावर दहा जिल्ह्यात दहा मॉल तयार करणार. टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात उमेद मॉल तयार करणार आहोत. त्याचबरोबर राज्यात एक कोटी लखपती दीदी करण्याचा संकल्प आहे. सध्या राज्यात १८ लाख लखपती दीदी असून मार्चपर्यंत पंचवीस लाख लखपती दीदी करणार आहोत, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.११) केली.

बांद्रा–कुर्ला संकुल, बांद्रा, मुंबई येथे ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत उमेद–महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने ११ ते २३ फेब्रुवारीदरम्यान सुरू राहणाऱ्या महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन–२०२५चे उद्घाटनावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. वेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, 'उमेद'चे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, उमेदचे मुख्य परिचलन अधिकारी परमेश्वर राऊत यांच्यासह राज्यभरातून बचत गटांच्या महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'महालक्ष्मी सरस' हा गेली २१ वर्ष अविरत सुरू असलेला उपक्रम आहे. 'उमेद' अभियानाच्या प्रगतीचा मी स्वतः साक्षीदार आहे. 'उमेदच्या' माध्यमातून 'महालक्ष्मी सरस' हा राज्यभरात महिला बचत गटांना एक हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा उपक्रम झाला आहे. महिला बचतगटांची उत्पादने खूप चांगली असतात, पण यांच्या विक्रीसाठी खूप उपाययोजना कराव्या लागतात. यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जिल्हा परिषदेच्या परिसरात उमेद अभियानाच्या माध्यमातून मॉल उभारणार. यासाठी आगामी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल. प्राथमिक स्तरावर दहा जिल्ह्यांत 'उमेद मॉल' उभारण्यात येतील, असे मुख्यमंत्री यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बचत गटांमार्फत तयार केलेली वस्तू ही खाजगी कंपनीच्या मालापेक्षा अत्यंत उत्कृष्ट दर्जाची असून ती अत्यंत माफक दरात उपलब्ध होतात. 'उमेद'च्या माध्यमातून ६० लाखांपेक्षा अधिक कुटुंब आर्थिक प्रगती करत आहेत. या माध्यमातून बचत गटातील महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'लखपती दीदी'ही योजना आणली आहे. आज महाराष्ट्रात ११ लाखपेक्षा जास्त 'लखपती दीदी'आहेत. लवकरच २५ लाख महिलांना 'लखपती दीदी' करण्याचा शासनाचा मानस आहे. आगामी कालावधीत एक कोटी महिला लखपती दीदी करण्याचा संकल्प आहे. शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी, लाडकी बहिण योजना, एस. टी. मध्ये प्रवास सवलत यासह अनेक महिला सक्षमीकरणाच्या योजना आणल्या आहेत. लाडका भाऊ म्हणून लाडक्या बहिणींच्या विकासासाठी सदैव पाठीशी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# पनवेलमधील झोपडपट्टी पुनर्वसनाला गती

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत बैठक; सकारात्मक चर्चा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसनासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढाकार घेतला असून या संदर्भात त्यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.१०) महत्त्वपूर्ण बैठक झाली.

या बैठकीला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पनवेल एसटी बसस्थानक ते रेल्वे स्टेशन परिसरातील झोपडपट्टी परिसरात विकास आराखड्यामुळे निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी यापूर्वीच झोपडीधारकांना दिशाभूल करणाऱ्यांपासून सावध राहण्याचा सल्ला दिला आहे. पंतप्रधान आवास योजनेच्या अंतर्गत सर्वेक्षण सुरू असल्यामुळे पुनर्वसन निश्चित होईल आणि एकही झोपडीधारक बेघर होणार नाही, असे त्यांनी आश्वासित करून झोपडपट्टीवासीयांना मोठा दिलासा दिला होता. त्यावेळी झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी पालिका आयुक्तांची भेट घेऊ, गरज भासल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व संबंधित अधिकाऱ्यांना भेटून हा प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन देत तुम्हाला सर्वांना न्याय भेटेल आणि जोपर्यंत पुनर्वसनाच्या बाबतीत न्याय मिळत नाही तो झोपडपट्टीवासीयांच्या एकाही घराला हात लावू देणार नाही, असा विश्वास देत भाजप तुमच्या पाठीशी काल होता, आज आहे आणि उद्याही राहील, असे आश्वासित केले होते. त्यानुसार आयुक्त मंगेश चितळे यांच्यासमवेत आमदार प्रशांत ठाकूर यांची बैठक झाली.

पनवेल महापालिका हद्दीतील झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन हा महत्वाचा विषय असून त्या कामासाठी आमदार प्रशांत ठाकूर सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत. त्या अनुषंगाने झालेल्या या बैठकीत प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. **(पान २ वर..)**

## दिव्यांगांच्या कल्याण व सक्षमीकरणासाठी डीपीडीसीमध्ये एक टक्का निधी राखीव

### ■ उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात दिव्यांग व्यक्तींची संख्या महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या २.६३ टक्के इतकी आहे. राज्यातील दिव्यांग व्यक्तींची लक्षणीय लोकसंख्या विचारात घेता, त्यांच्या कल्याण व सक्षमीकरणाकरीता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५–२६पासून प्रत्येक वर्षी नियमित योजनांसाठी अनुज्ञेय असलेल्या निधीमधून कमाल एक टक्का निधी राखीव ठेवण्यात येईल अशी माहिती, उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी दिली.



जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना, शाश्वत विकास ध्येय आणि मूल्यमापन सनियंत्रण व डाटा एन्ट्री यासाठीच्या एकंदरीत पाच टक्के निधी वगळून नियमित योजनांसाठी अनुज्ञेय असलेल्या ९५ टक्के निधीमधून १९ टक्के निधी विविध प्रशासकीय विभागांच्या नियमित योजनांसाठी राखून ठेवण्यात येतो. उपमुख्यमंत्री पवार यांनी ५ फेब्रुवारी, २०१५च्या राज्यस्तर जिल्हा वार्षिक योजना सन २०२५–२६ आराखडा बैठकीत राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या कल्याण व सक्षमीकरणाकरीता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत कमाल एक टक्कापर्यंत निधी राखून ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण व कल्याण या करीता राखून ठेवावयाच्या एक टक्का निधीचा सुयोग्य विनियोग होण्याकरीता त्यासंबंधीच्या योजनेचे सुस्पष्ट आदेश नियोजन विभाग, वित्त विभाग यांच्या मान्यतेने दिव्यांग कल्याण विभागाकडून निर्गमित करण्यात येतील, अशी माहितीही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिली.

## निवडक

### तिरुपती मंदिर लाडू वाद; चार जणांना अटक

**तिरुपती :** गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये आंध्र प्रदेशमधील तिरुपती देवस्थानमध्ये प्रसादासाठी वाटण्यात येणाऱ्या लाडूवरून मोठा वाद निर्माण झाला होता. या लाडूंसाठी वापरण्यात येणाऱ्या तुपात प्राण्यांच्या चरबीचे अंश सापडल्यामुळे यावर संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या होत्या. या प्रकरणात जवळपास पाच महिन्यांनंतर चार जणांना सीबीआयच्या विशेष तपास पथकाने अटक केली असून त्यांची चौकशी चालू आहे.

### ज्येष्ठ मराठी साहित्यिक रा.रं. बोराडे यांचे निधन

**मुंबई :** मराठी ग्रामीण साहित्यात विपूल लेखन करणारे ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब रंगराव बोराडे उर्फ रा.रं. बोराडे यांचे मंगळवारी (दि.११) निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. एमजीएम रुग्णालयात बोराडे यांनी अखेरचा श्वास घेतला. पाचोळा या कादंबरीमुळे त्यांना 'पाचोळा'कार म्हणून साहित्यिक वर्तुळात ओळख मिळाली होती. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य क्षेत्रातील समर्पित सेवायात्री हरपल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

## एआयमुळे जीवनमान बदलतंय –पंतप्रधान नरेंद्र मोदी

**पॅरिस : वृत्तसंस्था**

एआय तंत्रज्ञानामुळे लाखो लोकांचे जीवन बदलत आहे. काळानुसार रोजगाराचे स्वरूप देखील बदलत आहे. एआयमुळे निर्माण झालेल्या रोजगार संकटावर उपाय शोधण्याची गरज आहे. तंत्रज्ञान नोकऱ्या हिरावून घेत नाही. एआयमुळे नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि. ११) व्यक्त केला. पॅरिसमधील ग्रँड पॅलेस येथे झालेल्या एआय शिखर परिषदेला ते संबोधित करत होते.



या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, 'एआय शिखर परिषदेचे आयोजन केल्याबद्दल आणि त्याचे सह–अध्यक्ष म्हणून आमंत्रित केल्याबद्दल मी माझे मित्र राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांचे आभारी आहे. एआय आपली अर्थव्यवस्था, सुरक्षा आणि अगदी आपल्या समाजालाही आकार देत आहे. मी एका साध्या प्रयोगाने सुरुवात करतो. तुम्ही तुमचा वैद्यकीय अहवाल एआय ॲपवर अपलोड केला तर ते तुमच्या आरोग्यासाठी त्याचा काय अर्थ आहे हे सोप्या भाषेत, कोणत्याही अवघड शब्दांविना स्पष्ट करू शकते; पण जर तुम्ही त्याच ॲपला डाव्या हाताने लिहिणाऱ्या व्यक्तीचे चित्र काढण्यास सांगितले तर ॲप बहुधा उजव्या हाताने लिहिणाऱ्या व्यक्तीला दाखवेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, एआय अभूतपूर्व प्रमाणात आणि वेगाने विकसित होत आहे. तसेच वेगाने स्वीकारले जात आहे. सीमा ओलांडूनही खोलवर परस्परावलंबन आहे. म्हणूनच आपल्या सामायिक मूल्यांचे प्रतिबिंबि असणारे, अडथळे दूर करणारे आणि विश्वास निर्माण करणारे प्रशासन आणि मानके स्थापित करण्यासाठी सामूहिक जागतिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. प्रशासन म्हणजे केवळ स्पर्धा व्यवस्थापित करणे नाही. तर प्रशासन म्हणजे क्षमतांचा अभाव असणार्यांसाठी समान संधी उपलब्ध करु देणे. म्हणून आपण काय करू शकतो याचा विचार करायला हवा, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले.

आपण ओपन सोर्स सिस्टीम विकसित केल्या पाहिजेत, ज्यामुळे विश्वास आणि पारदर्शकता वाढते. आपण पक्षपात न करता दर्जेदार डेटा सेंटर्स बांधले पाहिजेत, तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण केले पाहिजे आणि लोककेंद्रित अनुप्रयोग तयार केले पाहिजेत. आपण सायबर सुरक्षा, चुकीची माहिती आणि डीपफेकशी संबंधित चिंता दूर केल्या पाहिजेत. प्रभावी आणि उपयुक्त होण्यासाठी आपण हेदेखील सुनिश्चित केले पाहिजे की तंत्रज्ञान स्थानिक परिसंस्थेत रुजलेले आहे. एआय–संचालित भविष्यासाठी आपल्याला आपल्या लोकांना कौशल्य आणि पुनर्कौशल्य प्रदान करण्यासाठी गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले.

## राज्यातील कंत्राटी शिक्षक भरती रद्द

**पुणे : प्रतिनिधी**

राज्य सरकारने शिक्षक भरतीसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने नुकताच एक शासन निर्णय काढला आहे. या निर्णयानुसार आता सरकारी शाळांमध्ये दहा किंवा दहापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत डीएड बीएडधारक उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यासंदर्भातला शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा पूर्ण होत असल्याने नियमित शिक्षक पुन्हा या शाळांना शिकवणार आहेत.

कंत्राटी तत्त्वावर तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांची नियुक्ती त्यांच्या नियुक्तीचा कार्यकाळ संपुष्टात येणे किंवा ते कार्यरत असलेल्या पदावर नियमित शिक्षकाची नियुक्ती होणे यापैकी जे आधी घडेल, त्या कालावधीपर्यंत सुरु राहील. त्यानंतर त्यांना पुनर्नियुक्ती देता येणार नाही, असेही नमूद करण्यात आले आहे.

## शिवकुमार शर्मा हत्येप्रकरणी एक आरोपी अटकेत



**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथे रस्त्यावरील किरकोळ भांडणातून ४५ वर्षीय आयटी अभियंता शिवकुमार शर्मा यांची दोघांनी डोक्यात हेल्मेटचे घाव घालत हत्या केली होती. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर एकच खळबळ उडाली. एक आठवड्यापासून हत्या करणारे आरोपी फरार होते, मात्र यापैकी एका आरोपीला पकडण्यात नवी मुंबई पोलिसांना यश आले आहे.

रेहान शेख (वय २०) नामक आरोपीला पोलिसांनी पकडले असून दुसरा आरोपी फैजान शेख (वय २०) हा अद्याप फरार आहे. दोघेही अनुक्रमे नागपाडा आणि आग्रीपाडा येथे राहणारे होते. दोघेही डिलिव्हरी बॉयचे काम करत असल्याची माहिती समोर आली आहे.

३ फेब्रुवारी रोजी खारघर येथे ओव्हर टेक करण्याच्या वादातून रात्री ८.३० वाजता दोन्ही आरोपींनी शर्मा यांची डोक्यात हेल्मेटचे घाव घालून पळ काढला. त्यानंतर शर्मा यांनी खारघर पोलीस ठाण्यात मारहाणीची माहिती दिली, मात्र पोलीस ठाण्यात ते अचानक कोसळून पडले. पोलिसांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले, पण तिथे पोहचल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

आरोपी खारघर येथे आयोजित केलेल्या मुस्लीम समुदायाच्या समारंभाला गेले. तिथून रात्री १०.३० वाजता ते घरी गेले. दरम्यान, दुसऱ्या आरोपीचा शोध पोलिसांच्या विविध पथकामार्फत सर्वत्र सुरू आहे.

# नेमबाज सिद्धी देशमुखला आर्थिक पाठबळ

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून मदत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

धनुर्विद्या खेळाडू सिद्धी विश्वास देशमुख हिला अर्चरी अर्थात तिरंदाजी साहित्यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दीड लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली असून हा धनादेश मंडळाचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ११) सिद्धीला प्रदान करण्यात आला. या वेळी भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, अनिल कोळी, अंकुश पाटील, विश्वास देशमुख आदी उपस्थित होते.

पनवेलची सिद्धी देशमुख हीधनुर्विद्या स्पर्धेत सहभाग घेत असते. तिने मुंबई विभागीय स्पर्धेत सुवर्णपदक, आंतरविभागीय स्पर्धेत कांस्यपदक, द्रोणा कप स्पर्धेत सांघिक कांस्यपदक अशी विविध पदके तिने पटकाविले आहेत. आगामी स्पर्धांकरिता तिच्याकडे आधुनिक तिरंदाजी साहित्याची आवश्यकता होती. त्या अनुषंगाने तिचे वडील विश्वास देशमुख यांनी या संदर्भात मदतीसाठी मंडळाकडे मागणी केली होती. त्या अनुषंगाने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत व सचिव परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली.

आगामी स्पर्धांसाठी तिला आवश्यक असलेल्या आधुनिक तिरंदाजी साहित्याच्या मदतीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने दीड लाख रुपयांची मदत दिली. यामुळे सिद्धीच्या खेळातील प्रगतीस आणखी चालना मिळणार आहे. सिद्धीच्या वडिलांनी मदतीसाठी मंडळाकडे केलेल्या मागणीला प्रतिसाद देत मंडळाने आर्थिक सहाय्य दिले, जे निश्चितच तिच्या भविष्याच्या स्पर्धांमध्ये उपयुक्त ठरणार असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिद्धीला पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

# रायगडातील ५० केंद्रांवर बारावीची परीक्षा सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी)ची लेखी परीक्षा मंगळवारपासून (दि. ११) सुरू झाली. ही परीक्षा १८ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. रायगड जिल्ह्यात ५० परीक्षा केंद्रांवर बारावीची परीक्षा सुरु झाली असून जिल्ह्यात ३१ हजार ८५७ परीक्षार्थी परीक्षेला बसले आहेत.

परीक्षा केंद्रांवर कोणताही अनुचित प्रकार घडूनये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परीक्षा केंद्र परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. प्रत्येक तालुक्यांकर एक पथक नियुक्त केले आहे. ही पथके अचानक परीक्षा केंद्रांना भेट देत आहेत. परीक्षा केंद्रांत प्रवेश करताना परीक्षार्थींची तपासणी केली जात आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे.



यंदा रायगड जिल्ह्यात ३१ हजार ८१७ विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेसाठी नोंद केली आहे. सर्वाधिक विद्यार्थी पनवेल तालुक्यांत ११ हजार ७६८ तर सर्वांत कमी २२१ विद्यार्थी तळा तालुक्यात आहेत. उरण तालुक्यांत २१२४, खालापूर २२९०, कर्जत २५०५, सुधागड ६९८, पेण १८४०, अलिबाग २६४८, मुरूड ५१८, रोहा १७७२, माणगांव १५१६, म्हसळा ५८२, श्रीवर्धन ७१६, महाड २३२२ तर पोलादपूरमध्ये २९७ विद्यार्थी आहेत.

दरम्यान, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समिती अध्यक्ष किशन जावळे यांनी मंगळवारी (दि.११) अलिबाग शहरातील जनरल अरुण कुमार वैद्य कनिष्ठ महाविद्यायातील केंद्राला अचानक भेट दिली. त्यांच्या समवेत रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड होते.

### कॉपी प्रकारावर होणार कारवाई

**मुंबई :** दहावी, बारावी परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा, असे आदेश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिले आहेत.

# मुंबई-पुणे मिसिंग लिंक लवकरात लवकर पूर्ण करा : राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

**मुंबई : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरील महत्वाकांक्षी मिसिंग लिंक प्रकल्पाची नुकतीच पाहणी केली. या दौऱ्यात त्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला तसेच प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आणि ऑगस्ट २०२५ अखेर प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, प्रकल्प दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावा यासाठी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

### एकूण सुधारित मार्ग

***खालापूर ते खोपोली इंटरचेंज आणि खोपोली एक्झिट ते कुसगाव (सिंहगड संस्था) दरम्यानचा भाग आहे.यामध्ये सध्याचे १९ किमीचे अंतर ६ किमीने कमी होऊन १३.३ किमी इतके होणार आहे.प्रवासाच्या वेळेत २०-२५ मिनिटांची बचत,इंधन बचत आणि वायू प्रदूषणात घट,घाट रस्त्यावरील वाहतूक कोंडी आणि अपघातांची शक्यता कमी होण्यास मदत होणार आहे.***

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील बोरघाटात वाहतूक कोंडी आणि अपघात होतात. तसेच, पावसाळ्यात येथे दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे वाहतुकीला अडथळे येतात. हे लक्षात घेऊन, हा नवीन मार्गिका प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

मिसिंग लिंक प्रकल्प पूर्ण झाल्यास मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सोयीस्कर होईल, असा विश्वास राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

या दौऱ्यादरम्यान महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या पुणे विभागातील अधिक्षक अभियंता राहुल वसईकर, कार्यकारी अभियंता राकेश सोनवणे तसेच प्रकल्प सल्लागार, कंत्राटदार आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.



## भगवे वस्त्र नेसून आलेला साधू निघाला चोर!

### मोबाईल चोरून झाला फरार

**नेरळ: प्रतिनिधी**

नेरळ बाजारपेठ येथे भगवे वस्त्रे नेसून आलेला साधू हा चोर निघाला असून त्याने बाजारपेठेत मोबाईल चोरी केली आहे. दरम्यान मोबाईल चोरी करून साधू पळून जाण्यात यशस्वी ठरला आहे. नेरळ मोहसीन मार्केट येथे दक्षिणा मागण्याच्या हेतूने हा साधू दुकानात आला असता दुकानात काम करणाऱ्या महिला कर्मचारीने काउंटर वर ठेवलेला मोबाईल या साधूने डाव साधत चोरून नेला. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला.

नेरळ रेल्वेस्थानकाजवळील मुख्य बाजारपेठेतील मोहसीन मार्केट येथील दुसऱ्या मजल्यावर ही चोरी झालेली आहे.दुकानात दक्षिणा मागण्यासाठी भगवे वस्त्र नेसून आलेल्या अज्ञात व्यक्तीने दुकानात कोणीच दिसत नसल्याने,काउंटरवर असलेला मोबाईल फोन सावकाश उचलून हा साधू फरार झाला. दरम्यान दुकानात काम करणाऱ्या महिलेला आपला मोबाईल कुठे सापडून येत नसल्याने दुकानात आलेल्या साधुवर संशय घेतला असता, हा प्रकार सीसी टिव्ही कॅमेरात पाहिल्याने हा खात्री पक्की झाली.महिलेने परिसरात आरडाओरड केली परंतू साधू पसार झाला होता.

नेरळ रेल्वेस्थानकाला लागूनच ही बाजारपेठ असल्याने हा साधू ट्रेन पकडून गेल्याचे सांगण्यात आले नेरळ शहरात चोरीसाठी येणाऱ्या भुरट्या चोरांनी नवनवीन प्रयोग वापरून चोरी करण्यास सुरुवात करून सर्वसामान्य नागरिकाला लुटण्यासाठी घातलेला हा थैमान नेरळ पोलीस कसे रोखणार हेदेखील पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## पत्रकार दिवाकर शेजवळ यांना राज्यस्तरीय मूकनायक पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक' या पाक्षिकामागील सामाजिक जाणीव आणि बांधिलकी जपणाऱ्या पत्रकारितेचा वारसा जतन करण्यासाठी मराठवाड्यातील 'शाक्य मूनी प्रतिष्ठानने यंदा राज्यस्तरीय मूकनायक पुरस्कार' सुरू केला आहे. पहिल्या वर्षातील या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ यांची निवड करण्यात आली आहे.



ते गेली ३५ वर्षे पत्रकारितेत असून मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यकारिणी सदस्य आहेत. या पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपये रोख, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे आहे. त्याची घोषणा बीड येथे झालेल्या एका बैठकीनंतर ' शाक्य मूनी प्रतिष्ठान ' चे अध्यक्ष प्रा. शरद वंजारे आणि सचिव प्रा. डॉ. संजय कांबळे यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे. या बैठकीला प्रा.दिपक जमधाडे, सारीका वाघमारे,किशोरी मस्के,उज्वल गायकवाड,सिध्दार्थ वाघमारे हे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

दिवाकर शेजवळ यांना ' मूकनायक पुरस्कार ' येत्या रविवारी १६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता अशोका हॉल पी.ई. एस अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित समारंभात देण्यात येणार आहे. प्रा. शरद वंजारे यांच्या अध्यक्षतेखालील या समारंभाला ड. जयमंगल धनराज, प्राचार्य डॉ. अभिजित वाडेकर, प्रकल्प संचालक अशोक सिरसे, ज्येष्ठ पत्रकार विजय बहादुरे आदी मान्यवर प्रमुख अतिथी आहेत.

## १२८ थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त; सात कोटी ४८ लाख वसूल

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मालमत्ताकर हा नवी मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा स्त्रोत असून त्यामधूनच नागरी सुविधा पुरविण्यात येत असल्याने मालमत्ताकर विभागामार्फत करवसूली प्रभावीपणे करण्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. यामध्ये मालमत्ताकराचे थकबाकीदार असलेल्या व्यक्ती, संस्था यांना आवाहन करूनही तसेच नोटीस बजावूनही त्यांच्यामार्फत प्रतिसाद दिला जात नसेल तर अशा थकबाकीदारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.



महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यामार्फत या प्रक्रियेकडे बारकाईने लक्ष दिले जात असून नोटीसीला प्रतिसाद न देणा-या १२८ थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. यामधील ३० थकबाकीदारांनी नोटीस मिळाल्यानंतर आपली थकबाकी व मालमत्ताकर जमा केला असून त्यापोटी महानगरपालिकेकडे ७ कोटी ४८ लक्ष इतकी रक्कम जमा करण्यात आलेली आहे.

या कारवाईमध्ये अमेय को-ऑप.हौ.सोसायटीमधील ३ थकबाकीदारांनी थकीत मालमत्ताकर भरणा करणेबाबत बजावलेल्या नोटीसीकडे दुर्लक्ष केल्याने या तिन्ही मालमत्ता टाळे लावून सिलबंद करण्यात आलेल्या आहेत.

सदर करवसूली प्रक्रियेत महापालिका आयुक्त यांचे मार्गदर्शनानुसार १ लाखापेक्षा अधिक रक्कमेचे थकबाकीदार असणा-या मोठ्या थकबाकीदारांची उतरत्या क्रमाने यादी तयार करण्यात आली होती. यामधील ८ हजार मोठ्या थकबाकीदारांना थकबाकी भरण्यासाठी ७ दिवसांची मुदत देऊन नोटीसा बजावण्यात आल्या. या नोटीसांनाही प्रतिसाद न देणाऱ्या १२८ थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात आल्याची माहिती मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त शरद पवार यांनी दिली.

थकबाकीदारांच्या यादीनुसार यापुढील काळात थकबाकीदार सोसायट्यांची नळजोडणी खंडित करण्याची कारवाई सुरु करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे मालमत्ता जप्तीची कारवाई करूनही थकबाकी न भरता नोटीसीला प्रतिसाद न देणा-या थकबाकीदारांच्या मालमत्तांचा लिलाव करण्याची कारवाई देखील सुरू करण्यात येत आहे.

## फसव्या संदेशापासून सावधान! महावितरणचे ग्राहकांना आवाहन

**कल्याण : प्रतिनिधी**

अनोळखी क्रमांकावरून वीजबिल भरण्यासंदर्भातील येणाऱ्या फसव्या संदेशाला बळी पडू नये आणि वीज ग्राहकांना लुटणाऱ्या सायबर स्कॅमरपासून सावध राहण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. महावितरणचे संकेतस्थळ तसेच मोबाईल ॲपवर बनावट मेसेजद्वारे होणारी फसवणूक कशी रोखता येईल, याची विस्तृत माहिती उपलब्ध आहे.

### सतर्क राहा; फसवणूक टाळा!

***महावितरण तुम्हाला कोणत्याही व्यक्तीशी संपर्क साधण्यास सांगत नाही, महावितरण केवळ VM-MSEDCL/VK-MSEDCL/-M-MSEDCL/JM-MSEDCL gma»¶m SENDER ID वरून एसएमएस पाठवते आणि कोणत्याही वैयक्तिक मोबाइल क्रमांकावरून एसएमएस व व्हॉटस्ॲप मेसेज, इ-मेल पाठविण्यात येत नाहीत. बिलाच्या पेमेंटसाठी लिक किंवा कोणतेही सॉफ्टवेअर डाउनलोड करू नये. मेसेजमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही वैयक्तिक मोबाइल क्रमांकावर संपर्क साधू नये.ऑनलाइन पेमेंट करताना कोणत्याही परिस्थितीत तुमचा मोबाइल किंवा डेस्कटॉप स्क्रीन किंवा तुम्हाला मिळालेला जढ्ढ शेअर करू नका. ग्राहक जवळच्या सायबर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार / एफआयआर नोंदवू शकतो***

तुमचे वीज बिल अपडेट नसल्याच्या कारणावरून आज रात्री वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. याकरिता ताबडतोब सोबत दिलेल्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा, असे बनावट मेसेज नागरिकांना पाठविण्यात येत आहेत. एखाद्या ग्राहकाने संपर्क साधला तर वीज बिल भरण्यासाठी वैयक्तिक मोबाइल क्रमांकावरून ऑनलाइन पेमेंटसाठी बनावट लिंक पाठवून ग्राहकांना सॉफ्टवेअर डाउनलोड करण्यास सांगितले जाते. त्यास प्रतिसाद दिल्यास मोबाइल किंवा संगणक हॅक करून बँक खात्यातील रक्कम लंपास होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी अशा बनावट मेसेजकडे पूर्णपणे दुर्लक्ष करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

महावितरणकडून केवळ मोबाइल क्रमांकाची नोंदणी केलेल्या वीजग्राहकांनाच सिस्टमद्वारे पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्ती, तांत्रिक किंवा अन्य कारणांमुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास तो पूर्ववत होण्यास लागणारा संभाव्य कालावधी तसेच दरमहा वीजबिलांची रक्कम, स्वतःहून मीटर रीडिंग पाठविण्याचे ग्राहकांना आवाहन, मीटर रीडिंग घेतल्याची तारीख व वापर केलेली एकूण युनिट संख्या, वीजबिलाची रक्कम देय दिनांक, वीजपुरवठा खंडित करण्याची रीतसर नोटीस आदींची माहिती एसएमएसद्वारे पाठविण्यात येते. तसेच अधिकृत मेसेजमधून वीजग्राहकांना किंवा नागरिकांना महावितरणच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या वैयक्तिक मोबाइलवर संपर्क करण्याबाबत कळवत नाही.

## परीक्षा केंद्राला जिल्हाधिकाऱ्यांची अचानक भेट

### अलिबाग शहरातील बारावीच्या परीक्षा केंद्रांमध्ये पाहणी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समिती अध्यक्ष किशन जावळे यांनी अलिबाग शहरातील बारावीच्या परीक्षा केंद्रांना अचानक भेट देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी केली.बारावी परीक्षेसाठी जिल्ह्यात एकूण ५० परीक्षा केंद्र असून ३१ हजार ८५७ विद्यार्थी बसले आहेत.



जिल्ह्यातील परीक्षांचे संचलन सुयोग्य व परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार होऊ नयेत यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समिती अध्यक्ष किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीची स्थापन करण्यात आली आहे. राज्यात दहावी व बारावीच्या परीक्षामधील गैरप्रकार रोखण्यासाठी कॉपीमुक्त अभियानाची देखील प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.जिल्ह्यात परीक्षा काळात अनुचित प्रकार घडू नये यासाठी भरारी पथके नियुक्त करण्यात आले आहे.

इंग्लिश विषयाची परीक्षा सुरू असताना जिल्हाधिकारी किशन जावळे आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ भरत बास्टेवाड यांनी जनरल अरुण कुमार वैद्य महाविद्यालय येथील केंद्राला अचानक भेट दिली. त्यांनी तेथील सुरक्षा व्यवस्थेची व परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली.

परीक्षेतील गैरप्रकारांना सहकार्य करणाऱ्यांविरोधात तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावे, असे निर्देश जावळे यांनी केंद्र प्रमुखांना यावेळी दिले. कॉपीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा येत असल्याने असे प्रकार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने यावर्षी कठोर उपाय केले आहेत. येत्या काळात प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी अचानकपणे जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांना भेट देणार असून तेथे गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत

> **कॉपीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा येत असल्याने असे प्रकार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने यावर्षी कठोर उपाय केले आहेत. येत्या काळात प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी अचानकपणे जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांना भेट देतील. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**
>
> **- किशन जावळे , जिल्हाधिकारी रायगड जिल्हा**

पान १ वरून

## पनवेलमधील झोपडपट्टी पुनर्वसनाला गती

झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया होत असताना अधिकृत फॉर्मचे वाटप करताना काही राजकीय संघटनांकडून पैसे वसूल केले जात असल्याचे या बैठकीच्या माध्यमातून आयुक्त मंगेश चितळे यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. या संदर्भात अधिकाऱ्यांनी झोपडपट्टी परिसरांमध्ये जाऊन जनजागृती करण्याची आवश्यकता असल्याचे या बैठकीत ठरविण्यात आले, त्यामुळे लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीपासून वाचवता येणार आहे.

या बैठकीत झोपडपट्टीवासीयांसाठी अधिक प्रभावी उपाययोजना आखण्याचे ठरवण्यात आले आणि या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी त्वरित पावले उचलण्यावर भर देण्यात आला असून आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिका झोपडपट्टीवासीयांना सुरक्षित, स्वच्छ, आणि चांगल्या राहणीमानासाठी वचनबद्ध नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे झोपडीधारकांसाठी एक महत्त्वाचे आणि सकारात्मक उचलले गेले आहे.

## नेरळ मंडळ अधिकारी लाच घेताना जाळ्यात

**नेरळ : प्रतिनिधी**

पंधरा हजारांची लाच घेताना नेरळ मंडळ अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला आहे.संदीप भंडारे असे या मंडळ अधिकाऱ्याचे नाव असून तो डोंबिवली येथील राहणारा आहे. तक्रारदार यांची जागेची नोंद करून घेण्यासाठी मंडळ अधिकारी यांनी १५ हजाराची मागणी केली होती आखेर मंगळवारी (दि.११) लाच घेताना मंडळ अधिकारी भंडारे नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्यात जाळ्यात अडकला.

यावेळी मंडळ अधिकारी यांच्या कारमध्ये आणि त्याच्याजवळ एक लाख अशी रक्कम देखील सापडून आल्याची माहिती समोर आली आहे. ही कारवाई डीवायएसपी नितीन दळवी, पोलीस निरीक्षक संतोष पाटील, एस आय प्रदीप जाधव, पोलीस हवालदार रतन गायकवाड,पोलीस हवालदार नाईक, अहिरे, प्रमिला विश्वासराव यांनी केली आहे.

## थेरोंडा येथे सातारकरांच्या म्हसोबा जत्रेला सुरुवात

**रेवदंडा: प्रतिनिधी**

सातारा जिल्हांतील विविध गावातील भाविक ग्रामस्थांचे परंपरागत म्हसोबा यात्रेसाठी आगमन झाले असून यावर्षी सुध्दा मोठया जल्लोषात, उत्साहाने म्हसोबा देवाला मानपानाचा धार्मिक विधी होत आहे. पिढयानंपिढया रोजदांरी,व्यवसायाने निगडीत असलेलं पिढयानंपिढयाचं अतुट नातं सातारा जिल्हांतील अनेक कुटूंबांनी प्रतिवर्षी म्हसोबा यात्रेच्या निमित्ताने थेरोंडा गावाशी जोपासले आहे.



पुर्वीच्या काळी शेतीचा हंगाम संपला की, दिवाळीच्या मुर्हूताने सातारा जिल्हांतील अनेक गावातील कुटूंबे रोजदांरी व व्यवसायाच्या निमित्ताने तळ कोकणात महाबळेश्वर, पोलादपुर, रोहा मार्गे थेट रेवदंडा-थेरोंडा पर्यंत रोजदांरी, व्यवसाय करत फिरत होते. गावागावातून कुटूंबाच्या लवाजाम्यासह पायी चालत गाढव, डुकर यांच्या संगतीने धार लावणे, गायी म्हशीच भद्रावण करणे आदी व्यवसाय करून आर्थिक उत्पन्न घेत असत.

सातारा जिल्हांतील या हिंदु कोलाटी जातीच्या कुटूंबाचे येथे पिढयानंपिढयाचं नातं होत. पिढयानंपिढया असलेल्या रितीरिवाजाप्रमाणे सातारा जिल्हांतील ही कुंटूबे विविध ठिकाणी रोजदांरी, व्यवसाय करून शिमग्याचे पुर्वी थेरोंडा येथे एकत्रीत येत असत. आगलेची वाडी नजीकच राहूटी उभारून या मध्ये ही कुटूंबे वस्तीस राहत असत, तेथेच हिंदू कोलाटी जातीच्या मोरे, जावळे, लाखे, लघू जावळे आदी आडनावाच्या कुटूंबाचे कुलैदवत मंदिर अद्यापही आहे.

बदलत्या काळात ही या साताराकर कुटूंबाचे म्हसोबा देवस्थानाची श्रध्दा व भक्ती तसभूरही कमी झाली नाही. हिंदू कोलाटी जातीच्या मोरे, जावळे, लाखे, लघू जावळे आदी आडनावाची कुटूंबे प्रतिवर्षी म्हसोबाचे यात्रेच्या निमित्ताने येथे दहा, बारा दिवस राहूटी उभारीत वस्तीत राहतात. मात्र आता वाहनाने येतात व पिढयानंपिढया सुरू असलेले धार्मिक विधी येथील म्हसोबा मंदिरातील देवाशी पार पाडतात.

### दुखवटा

## माधुरी सोमण

**पनवेल** : शिवसेनेचे स्थानिक नेते, ज्येष्ठ शिवसैनिक तथा पोलीस मित्र चंद्रशेखर सोमण यांच्या मातोश्री व शिवसेना शिंदे गटाचे महानगरप्रमुख माजी नगरसेवक प्रथमेश सोमण यांच्या आजी माधुरी यशवंत सोमण (वय ८१) यांचे वृद्धापकाळाने महाड येथे निधन झाले.त्यांच्या मागे दोन मुलं, दोन मुली, सहा नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. दशक्रिया विधी सोमवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी पार पडेल असे कुटुंबीयांकडून कळवण्यात आले आहे.



# पनवेल महानगरपालिकेतर्फे प्रधानमंत्री आवास योजना लाभार्थ्यांची नोंदणी सुरु

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाने सर्वासाठी घरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल मनपा अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत शहरामध्ये नागरिकांची नोंदणी करावयाचे काम सुरु झाले आहे.

यामध्ये ज्या लाभार्थ्यांच्या नावावर जागा असेल अशा लाभार्थ्यांकरिता (उत्पन्न अट साडेचार लाख पर्यंत) वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधकाम करून देण्यात येणार आहे. भागीदारी तत्वावरील परवडणारी घरे या अंतर्गत शासकीय जमिनी वरील गृहनिर्माण प्रकल्प अथवा खाजगी जमिनीवरील खाजगी विकासकाद्वारे गृह प्रकल्प उभारण्यात येणार आहे. तसेच शासकीय जमिनीवरील गृह प्रकल्प, खासगी विकासकाद्वारे लाभार्थ्यांना भाडे तत्वावर परवडणारी घरे बांधण्यात येणार आहेत. तसेच केंद्र शासन व बँक यांच्याशी संबधीत व्याज अनुदान योजना जाहिर करण्यात आली आहे.



**पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी लागणारी कागदपत्रे**

१. अर्जदाराचे आधार कार्ड, पॅन कार्ड (आधार कार्डनुसार नाव, जन्म तारीख, आधार नंबर)
२. कुटुंबातील इतर सदस्याचे आधार कार्ड (आधार कार्ड नुसार नाव, जन्म तारीख, आधार नंबर)
३. उत्पन्नाचा दाखला , ४. बँक पासबुक (आधार लिंक केले असले पाहिजे)
५. जात प्रमाणपत्र (SC/ST/OBC घटकांसाठी लागू)
६. जमिनीची कागदपत्रे (जर आपण घटक क्र. ०१ अंतर्गत अर्ज करणार असाल तर)

या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेची (शहरी) २.० राज्यात अंमलबजावणी करणे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी २.० अंतर्गत लाभार्थी सुनिश्चित करण्यासाठी मे. केंद्र शासनाने एक युनिफाईड वेब पोर्टल (http://pmaymis.gov.in/PM-YMIS2š2024/Pmay Default.asps) विकसित केले आहे. सदर पोर्टलवरती इच्छुक लाभार्थी यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे.

महापालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजना विभागाच्यावतीने या योजनेची कार्यवाही सुरू केली आहे. यामध्ये झोपडपट्टी मधील नागरिक, आशा वर्कर, वॉर्ड बॉय, अंगणवाडी सेविका, पोलीस कर्मचारी, पत्रकार, पालिका कर्मचारी, सफाईकामगार इत्यादींची नोंदणी करण्याचे काम चालू आहे.तसेच गावठाण भागामध्ये घटक क्रमांक १ इडव च्या अंतर्गत ज्या नागरिकांकडे प्रॉपर्टी कार्ड (सात बारा) आहे अशा नागरिकांना जर सबसिडीची आवश्यकता असेल ते नागरिक या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वेबिनार



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवार (दि.११ ) रसायनशास्त्र विभाग, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व कार्यशाळा व परिसंवाद समिती यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल युनियन ऑफ प्युअर अप्लाइड केमिस्ट्री – ग्लोबल वुमन्स ब्रेकफास्ट–२०२५ च्या अंतर्गत विज्ञान क्षेत्रातील समानता या विषयावर वेबिनारचे आयोजन केले होते.

या वेबिनारसाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. राजेंद्र शिरसाट ( गोवा युनिव्हर्सिटी) व डॉ. नितीन गुळवी यांनी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना हरित रसायनशास्त्र हे पर्यावरणास अनुकूल असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करते. त्यामध्ये रसायनाच्या उत्पादन प्रक्रियेमध्ये अशा बदलांचा समावेश केला जातो ज्यामुळे पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करता येतो तसेच त्यांनी यावेळीसंगणकीय सिम्युलेशन्स आणि मॉडेल्सचा वापर करून अणू आणि रसायनांच्या गुणधर्मांचा अभ्यास करता येतो याविषयी मार्गदर्शन केले.

या वेबिनारचा मुख्य उद्देश समाजातील विविध प्रकारच्या लोकांसाठी विज्ञानाच्या क्षेत्रात समान संधी आणि न्याय सुनिश्चित करणे तसेच यामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आणि लिंगाच्या बाबतीत असलेल्या भेदभावांना कमी करणे आणि प्रत्येकाला विज्ञान, संशोधन, आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात समान स्थान देणे हा होता.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या व रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला. हा उपक्रम घेण्यासाठी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. रुपाली नागरेकर तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## निवडक

### मोटरसायकल चोर अटकेत

**पनवेल:** रेल्वे कॉलनी तक्का येथून मोटार सायकल चोरणार्यास विष्णू नगर परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे. जयसिंग मीना यांची काळी टीव्हीएस अपाची मोटरसायकल रेल्वे कॉलनी तक्का येथून चोरीस गेली होती. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल मानकर यांनी अधिक तपासामध्ये आरोपी अनिल गोरे (वय २५) याला विष्णूनगर परिसरातून ताब्यात घेतले आहे व आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

### ठाणा नाका येथे बल्कर कलंडला

**पनवेल :** ठाणा नाका परिसरात एक बल्कर पहाटेच्या वेळेस कलंडल्याची घटना घडली आहे. पनवेलहून कळंबोलीच्या दिशेने जाणार्या खांदा कॉलनी उड्डाण पुलाजवळ हा अपघात झाला असून सदर बल्कर हा ठाणा नाका येथील वळणावर आला असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून तो पलटी झाला आहे. यामुळे काही काळासाठी वाहतूक कोंडी झाली होती. या घटनेची माहिती वाहतूक शाखेला मिळताच त्यांनी आयआरबीच्या अधिकार्यांच्या सहकार्याने हायड्राच्या सहाय्याने बल्कर रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत केली आहे.

### एटीएम कार्ड बदलून फसवणूक

**पनवेल :** अज्ञाताने एटीएममधून पैसे काढून देण्याच्या बहाण्याने एका महिलेच्या एटीएम कार्डची अदलाबदल करून तिच्या खात्यातून ४० हजार रुपये रोख रक्कम काढून घेतल्याची घटना घडली आहे. सुनिता बोरकर असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव असून त्या कामोठे सेक्टर ९ येथील कॅनरा बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेल्या असताना एका भामट्याने त्यांना पैसे काढून देण्याचा बहाणा करत एटीएम कार्डची अदलाबदल हातचलाखीने केली व त्यानंतर पैसे निघत नसल्याचा बहाणा केला व दरम्यानच्या काळात त्याने खर्या एटीएमच्या आधारे ४० हजार रुपये रोख काढून घेवून तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कामोठे वसाहतीत मोबाईलची चोरी

**पनवेल :** मुख्य रस्त्यावर मोबाईलवर बोलत असताना अज्ञात इसमाने त्याच्या हातातील मोबाईल हिसकावून पसार झाल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे. कामोठे वसाहतीमधील सेक्टर २० येथील मुख्य रस्त्यावर एक इसम मोबाईलवरुन बोलत जात असताना मोटार सायकलवरुन आलेल्या दुसर्या व्यक्तीने त्याच्या हातातील मोबाईल खेचून तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पार्क केलेल्या गाडीची चोरी

**पनवेल :** रस्त्यावर पार्क करून ठेवलेल्या प्लेझर गाडीची चोरी खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. सेक्टर ६ येथे राहणारे प्रफुल्ल बुटे यांनी त्यांची प्लेझर गाडी सोसायटीच्या गेटसमोरील रस्त्यावर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने या गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

### व्यावसायिकाची ३० लाखांची फसवणूक

**पनवेल :** फोनवरून संपर्क साधून ऑनलाईन फसवणूक करण्याचे प्रकार पनवेल परिसरात जोरदार सुरू आहेत. खारघरमध्ये अशाच एका प्रकरणात लग्न करण्याचे आमिष दाखवून ५० वर्षीय व्यक्तीला ऑनलाईन गुंतवणूक करण्यास भाग पाडले. त्याची ३० लाख ९५ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे प्रकरण उजेडात आले. खारघर पोलीस ठाण्यात एका ५० वर्षीय व्यावसायिकाने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की संबंधित तरुणीने तिचे नाव गायत्री असे सांगितले. तिने फेसबुकवरुन त्यांच्याशी ओळख केली होती. मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यापासून लग्नाचे आमिष दाखवून तिने त्यांचा विश्वास संपादन केला. नंतर त्यांना अन्झो कॅपिटल या कंपनीत ट्रेड घेण्यास भाग पाडण्यात आले. सहाय्यक पोलीस निरिक्षक मिलिंद फडतरे हे फसवणूक करणार्या महिलेचा शोध घेत आहेत.



**पनवेल :** भारतीय जनता पक्षाचे सहसंस्थापक पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. साधी राहणी व उच्च विचारसरणी हा त्यांचा स्थायीभाव होता. शास्त्रे, धर्मग्रंथ आणि तात्त्विक ग्रंथांच्या चिंतनातून व मननातून त्यांनी 'एकात्ममानववाद' हा सिद्धान्त मांडला व भारतीय समाजापुढे ठेवला. त्यांना भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, कामगार नेते रवींद्र नाईक, के.सी. पाटील, विश्वजीत पाटील, अशोक आंबेकर, अंकुश पाटील, शत्रुघ्न उसाटकर, महेंद्र गोजे, प्रतिक पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.

# वनवासी कल्याण आश्रमात विद्यार्थ्यांना संगणक वाटप

**पनवेल : वार्ताहर**

जॉय ऑफ गिव्हिंग सामाजिक संस्था आणि आयकेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथील वनवासी कल्याण आश्रम (वसतिगृह) मध्ये शिक्षण घेत असलेल्या एवूण ४० विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान मिळावे या हेतूने संगणक उपलब्ध करुन देण्यात आले.

यावेळी 'जॉय ऑफ गिव्हिंग सामाजिक संस्था'चे नवी मुंबई समन्वयक वैभव पाटील आणि आश्रम केंद्रप्रमुख राजेंद्र शिंदे उपस्थित होते. 'जॉय ऑफ गिव्हिंग सामाजिक संस्था'चे संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे आणि 'आयकेअर फाउंडेशन'चे संचालक संतोष भोसले यांच्या सहयोगातून राबवण्यात येत असलेल्या 'संगणक साक्षरता' उपक्रमाच्या माध्यमातून आगामी काळात अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत संगणक पोहचवण्याचे उद्दिष्ट आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात संगणक ज्ञान अत्यंत महत्वाचे झाले असून, संगणकांच्या ज्ञानापासून ग्रामीण, दुर्गम आणि अदिवासी भागातील मुले वंचित राहू नयेत, यासाठी 'संगणक साक्षरता' उपक्रम राबविण्यात येत आहे, असे वैभव पाटील यांनी सांगितले. 'जॉय ऑफ गिव्हिंग सामाजिक संस्था' मार्फत ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी अनेक उपयोगी उपक्रम राबवण्यात येत असून, आयकेअर फाउंडेशनदेखील खासगी सामाजिक भागीदारीतून गरजू मुलांसाठी संगणकीय साहित्य आणि इतर मदत पोहोचवत आहे, अशी माहिती वैभव पाटील यांनी दिली. वनवासी कल्याण आश्रमास संगणक दिल्याबद्दल राजेंद्र शिंदे यांनी वैभव पाटील, गणेश हिरवे आणि संतोष भोसले यांचे आभार मानले.

# अभ्यासाच्या ताणातून विद्यार्थ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**पनवेल: वार्ताहर**

अभ्यासाच्या ताणामुळे एका विद्यार्थ्याने दुचाकी घेऊन पनवेल–शीव महामार्गावर विरुद्ध दिशेने दुचाकी चालवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही घटना रोडपाली येथील पुरुषार्थ उड्डाणपुलावर घडली. सुदैवाने या अपघातामध्ये संबंधित विद्यार्थी बचावला आहे, मात्र त्याची प्रकृती अजूनही अत्यवस्थ आहे. त्याच्यावर नजीकच्या कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या अपघाताबाबत कामोठे पोलीस ठाण्यात रितसर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संबंधित विद्यार्थी हा दुचाकीने आत्महत्या करण्याच्या उद्देशाने शीव पनवेल महामार्गावर विरुद्ध दिशेने प्रवास करत होता. संबंधित व्हॅगनर मोटारीचे आणि दुचाकीचे सुद्धा या अपघातामध्ये मोठे नूकसान झाले. रोडपाली उड्डाणपुलावर मुंबईच्या दिशेने जाण्याच्या मार्गिकेवर विद्यार्थ्याने दुचाकी चढविली. रात्रीच्यावेळी या उड्डाणपुलावर मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने वाहन धावतात. त्याच वाहनांच्या गर्दीत हा अपघात घडला.

व्हॅगनर मोटारीला ठोकल्यानंतर जखमी दुचाकीस्वाराची चौकशी केल्यावर जखमी मुलाने 'माझी तब्येत बरी नाही, माझा अभ्यास होत नाही. मला आत्महत्या करायची', अशी व्यथा ऐकल्यानंतर जमलेल्या प्रवाशांनी तातडीने पोलीसांना बोलावले. कामोठे पोलीससुद्धा काही मिनिटांतच तेथे पोहचले. पोलीसांनी इतर जमलेल्यांनी व्यक्तींच्या मदतीने जखमी विद्यार्थ्याला रुग्णालयात दाखल केले.

या दरम्यान पोलिसांनी विद्यार्थ्याच्या पालकांना संपर्क साधला. रात्री उशीरापर्यंत हा विद्यार्थी बेशुद्ध अवस्थेमध्ये होता. या संवेदनशील घटनेचा तपास कामोठे पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रियंका खरटमल या करीत आहेत. पोलीस अधिकारी खरटमल या संबंधित विद्यार्थ्याने असे का केले असावे, याचा शोध घेत आहेत.

# उरण तालुका केमिस्ट असोसिएशनच्या वतीने औषध निर्मात्यांसाठी प्रशिक्षण

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य औषधी व्यवसाय परिषदेच्या (एमएसपीसी) औषधे माहिती केंद्राच्या (डीआयसी) आप्पासाहेब शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेले निरंतर शिक्षण प्रणाली अंतर्गत

औषधे निर्मात्यांना प्रशिक्षण देणे सुरू करण्यात आले आहे. त्या अंतर्गत उरण तालुक्यातील औषधेनिर्माते (फार्मसिस्ट)साठी प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम उरण तालुका केमिस्ट असोसिएशनचे वतीने हॉटेल आनंदी भोईर बँक्विट हॉल येथे आयोजित करण्यात आले होते.



महाराष्ट्र राज्य औषध परिषदेचे अध्यक्ष अतुल अहिरे आणि औषध माहिती केंद्राचे प्रमुख गणेश बांगले आणि त्यांच्या टीमने एकाच दिवशी ३६ जिल्ह्यात ४४ ठिकाणी हा कार्यक्रम घेण्याचा विक्रम केला आहे. त्याच अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम फार्मसी मॅनेजमेंट कोर्स उरण येथे आयोजित केला होता.

महाराष्ट्र राज्य औषध परिषद सदस्य नितीन मणियार आणि रायगड जिल्हा केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स संघटनेचेअध्यक्ष लीलाधर पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. औषधे निरीक्षक हेमंत आढे यांनी औषध निर्मातांसाठी प्रशिक्षण कोर्स आयोजित करत असल्याने महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल आणि संघटनेचे कौतुक करून या प्रशिक्षणाचा फायदा घेऊन सर्व औषध निर्माता बंधू भगिनींनी रुग्ण सेवा द्यावी, असे सांगितले.

ज्येष्ठ फार्मासिस्ट शशांक म्हात्रे यांनी व्यवसाय संबंधी मार्गदर्शन केले. पूजा निकम यांनी सर्व औषध निर्माता बंधू-भगिनींना उत्तम प्रशिक्षण दिले.

# खारघरमध्ये पुन्हा कोल्ह्यांचे दर्शन

**खारघर : प्रतिनिधी**

खारघर शहरालगतच्या खाडी किनारी सोनेरी कोल्ह्यांचे मुक्तसंचार खूप वेळा पहावयास मिळते.

मागील महिन्यात हेच कोल्हे मानवी वस्तीत शिरल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली होती, मात्र पुन्हा एकदा रविवारी वास्तुविहार सोसायटीच्या मागील बाजूस खाडी किनारी दोन सोनेरी



कोल्हे शिकार केलेले डुक्कर खाताना पक्षी आणि प्राणीमित्र तरंग सरीन यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपले आहेत. खारघर शहरातील खारफुटीत जंगलात मोठ्या प्रमाणात जैव विविधेतचा अधिवास आहे. यापैकी कोल्हे कित्येक वर्षांपासून खाडीकिनारी पाहिले जात आहेत. नजीकच्या काळात विकासकामांमुळे खारफुटी नष्ट होत असल्याने हे सोनेरी कोल्हे मानवी वस्तीत शिरकाव करीत आहेत.त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीती पसरली होती.

# पोलिसांतर्फे तक्रार निवारण दिन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्यामार्फत तक्रार निवारण दिन साजरा करण्यात आला. या वेळी वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली इतर अधिकारी व कर्मचारी वर्गाने उपस्थित अर्जदार व गैर–अर्जदार यांच्या तक्रारी समजून घेऊन त्याचे संबंधित अधिकार्यांकडून निरसन करण्यात आले. तसेच उपस्थितांना सायबर सुरक्षा, नवीन कायद्यांविषयी मार्गदर्शन करून नवी मुंबई व्हॉट्सअॅप चॅनल तसेच इतर हेल्पलाईन क्रमांकाविषयी माहिती देण्यात आली. या वेळी ९० नागरिक उपस्थित होते.



## संपादकीय

# जागतिक व्यापारसंघर्षात वाढ

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडा आणि मेक्सिकोसह इतर सर्व राष्ट्रांतून होणाऱ्या पोलाद आणि ल्युमिनियमच्या आयातीवर २५ टक्के शुल्क लावण्याचा इशारा दिला आहे. अमेरिकेला या धातूंची निर्यात करणाऱ्या प्रमुख देशांमध्ये भारत नाही. परंतु भारत या दोन्हींचा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा उत्पादक आहे. अन्य वस्तूंवरील वाढीव शुल्काची घोषणाही लवकरच करण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. या साऱ्याचाच फटका भारतालाही बसू शकतो.**

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्ष पदाची सूत्रे स्वीकारण्यापूर्वीच काही देशांतून आयात होणाऱ्या वस्तूंवर शुल्क आकारण्याची घोषणा केली होती. अध्यक्षपदाच्या शपथविधीनंतर त्यांनी हे धोरण अंमलात आणण्यास सुरूवात केली. वास्तविक ट्रम्प यांना अमेरिकेत होणारी आयात हे आपली इतर धोरणे प्रत्यक्षात आणण्याच्या कामी हत्यार म्हणून वापरायची आहे असे म्हटले जाते. तूर्तास एखाद्या बाबतीत इशारा द्यायचा आणि नंतर वाटाघाटी करायच्या अशी त्यांची शैली दिसते आहे. अमेरिकी वस्तूंवर आयातशुल्क आकारणाऱ्या देशांच्या वस्तूंवर त्याच प्रमाणात शुल्क आकारले जाईल अशी घोषणा त्यांनी केल्यानंतर गेल्या शुक्रवारी अनेक देशांचे शेअर बाजार कोसळले. चीन, कॅनडा व मेक्सिको या देशांच्या बाबतीत ट्रम्प अधिक कठोर असल्याचे दिसते. कॅनडा व मेक्सिकोतून आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर २५ टक्के शुल्क लागू केले जाईल असे ट्रम्प यांनी जाहीर केले होते, मात्र नंतर लगेचच गेल्या आठवड्यात त्यांनी या धोरणाच्या अंमलबजावणीला ३० दिवसांचा विराम दिला. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळातही पोलाद आणि ल्युमिनियमवर अशाच प्रकारे शुल्क लादल्यामुळे जगात इतरत्र संरक्षणवादी धोरणाचा जोर वाढला. त्यातून भारतीय निर्यातीचेही नुकसान झाले. तेव्हाही ट्रम्प यांचा रोख अमेरिकेचे व्यापारहित, अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, नोकऱ्या बचावणे व वाढवणे तसेच अमेरिकेचा महसूल वाढवणे यांवरच होता, परंतु त्यांच्या आयातशुल्कविषयक धोरणांतून दोन वर्षांनी यातले काय साध्य झाले असा प्रश्न कोणालाही पडेल. त्यांनी आयातशुल्क वाढवल्यामुळे या धातूंची उत्पादने महागली. त्या तुलनेत आयात उत्पादनांचा पर्याय स्वस्त ठरला. अनेक अमेरिकी कंपन्यांनी तेव्हा आपल्याला आयातशुल्कातून सवलत देण्याची मागणी केली होती. हे सारे तपशील ट्रम्प प्रशासनाच्या लक्षात नसतील असे होणार नाही, परंतु त्यांना अनेक देशांशी वाटाघाटी करताना या इशाऱ्यांचा वापर करता येईल हे उघड आहे. उदाहरणार्थ कॅनडाचा ४० टक्के जीडीपी अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीवर अवलंबून आहे. या साऱ्यातून सरतेशेवटी त्यांचीच सरशी झाल्याचे चित्र निर्माण झाले तर ते त्यांच्या सोयीचेच आहे. चीनसोबतच्या वाटाघाटींचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. अलीकडच्या काळात त्यांनी जाहीर केलेल्या धोरणांमुळे अमेरिका आणि चीन यांच्या दरम्यान व्यापारयुद्ध भडकण्याची शक्यता जगभरातील तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. त्यातून महागाई वाढण्याचा अंदाजही व्यक्त होतो आहे. या साऱ्यातून गेल्या काही दिवसांपासून भारतीय शेअर बाजारातही मोठी उलथापालथ होते आहे. वास्तविक अमेरिकेला ल्युमिनियम आणि पोलाद यांची निर्यात करणाऱ्यांमध्ये भारताचे स्थान नगण्य आहे. अमेरिकेतील बहुतांश पोलाद आयात कॅनडा, ब्राझील आणि मेक्सिको या देशांतून होते, परंतु ट्रम्प यांच्या संबंधित इशाऱ्यांमुळे जागतिक व्यापारातील एकंदर संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता असून त्याचा फटका भारतालाही बसू शकतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी ट्रम्प यांना भेटणार असल्यामुळे अद्यापही आशेला जागा आहे इतकेच.

# संकटातील मुलांसाठी जीवनरेखा : १०९८ चाईल्ड हेल्पलाईन

भारतामध्ये लाखो मुले दररोज वेगवेगळ्या प्रकारच्या शोषण, अत्याचार आणि दुर्लक्षाला सामोरे जातात. त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्वरित मदतीसाठी भारत सरकारने १०९८ चाइल्ड हेल्पलाईन सुरू केली आहे. हा एक टोल-फ्री क्रमांक असून, संकटात असलेल्या मुलांना मदत करण्यासाठी २४X७ कार्यरत असतो. चला जाणून घेऊया या हेल्पलाइनचे महत्त्व, कार्यपद्धती

**१०९८ चाइल्ड हेल्पलाईन: काय आहे आणि कशी कार्य करते?**

१०९८ चाइल्ड हेल्पलाइन ही एक राष्ट्रीय आपत्कालीन सेवा आहे, जी ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी कार्यरत आहे. संकटात सापडलेल्या किंवा असुरक्षित स्थितीत असलेल्या मुलांना संरक्षण, समुपदेशन, पुनर्वसन आणि अन्य गरजेच्या सेवा पुरवण्याचे काम ही हेल्पलाइन करते. देशभरातील कोणत्याही फोनवरून १०९८ हा क्रमांक डायल करून त्वरित मदत मिळू शकते. या हेल्पलाइनच्या माध्यमातून तज्ज्ञ समुपदेशक आणि सामाजिक कार्यकर्ते मुलांना मानसिक आधार, कायदेशीर मदत, पुनर्वसन सुविधा आणि गरजेनुसार इतर सेवांसाठी मार्गदर्शन करतात.

**१०९८ हेल्पलाईन कोणत्या परिस्थितीत मदत करू शकते?**

ही सेवा संकटात असलेल्या मुलांसाठी अनेक प्रकारे मदत करू शकते. खालील परिस्थितींमध्ये १०९८ वर संपर्क साधला जाऊ शकतो. हरवलेले किंवा पालकांशिवाय असलेले मुले: जर एखादे बालक हरवले, मुलगा मुलगी हरवली असेल असेल किंवा कोणत्याही पालकाविना आढळले तर १०९८ च्या माध्यमातून त्याला सुरक्षित ठिकाणी पोहचवले जाते.

शोषण किंवा अत्याचार होत असेल: शारीरिक, मानसिक, लैंगिक किंवा आर्थिक शोषणाला बळी पडलेल्या मुलांना संरक्षण आणि कायदेशीर मदत पुरवली जाते.

बाल विवाह आणि बालकामगार : मुलांच्या हक्कांचे उल्लंघन करणारे बाल विवाह आणि बालमजुरी रोखण्यासाठी १०९८ वर तक्रार नोंदवता येते.

भिक्षा मागणारी मुले किंवा व्यसनाधीनता: बालक जर भिक्षा मागताना दिसला किंवा व्यसनाच्या आहारी गेला असेल तर त्याला योग्य मदत मिळवण्यासाठी १०९८ वर कॉल करता येतो.

शिक्षण आणि आरोग्याशी संबंधित समस्या: शिक्षणापासून वंचित असलेल्या किंवा वैद्यकीय मदतीची गरज असलेल्या मुलांना आवश्यक सेवा पुरवण्याचे काम हेल्पलाइन करते.

अनाथ, समर्पित किंवा दत्तक घेण्यास पात्र मुले: पालकविना राहणाऱ्या किंवा पुनर्वसन आवश्यक असलेल्या मुलांसाठी या हेल्पलाइनच्या माध्यमातून आवश्यक ती मदत मिळते.

**१०९८ चाइल्ड हेल्पलाईनद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा**

ही हेल्पलाइन फक्त तक्रारींचे नोंदणी केंद्र नसून, संकटात सापडलेल्या मुलांना संपूर्ण मदत करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा पुरवते...

समुपदेशन : मुलांना त्यांच्या मानसिक आणि भावनिक समस्यांवर मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षित समुपदेशक उपलब्ध असतात. हे समुपदेशन बालकांना त्यांच्या परिस्थितीतून सावरायला मदत करते.

त्वरित हस्तक्षेप : जर एखाद्या मुलाला तातडीने मदतीची गरज असेल, जसे की अत्याचार किंवा बालमजुरीच्या स्थितीत असेल, तर स्थानिक प्रशासन आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणांच्या सहकार्याने त्वरित कारवाई केली जाते.

रेफरल सेवा : जर एखाद्या मुलाला पुनर्वसन, शिक्षण, वैद्यकीय मदत किंवा पुनर्स्थापनेसाठी विशेष सेवांची गरज असेल, तर हेल्पलाइन त्या संबंधित संस्थांकडे त्याचा तपशील पाठवते.

माहिती व मार्गदर्शन : १०९८च्या माध्यमातून बालकांच्या हक्कांबाबत जागरूकता पसरवली जाते. पालक, शिक्षक व नागरिकांसाठीही ही सेवा मार्गदर्शन करते, जेणेकरून मुलांचे संरक्षण योग्य प्रकारे होऊ शकेल.

**१०९८ चाइल्ड हेल्पलाईनचा प्रभाव**

ही हेल्पलाइन सुरू झाल्यापासून लाखो मुलांना मदत मिळाली आहे. खालील महत्त्वाचे परिणाम यामुळे दिसून आले आहेत: १० दशलक्षाहून अधिक कॉल्स: हेल्पलाइनला दरमहा सरासरी ५०,०००हून अधिक कॉल्स प्राप्त होतात. पाच दशलक्षाहून अधिक मुलांना मदत: दुर्लक्ष, शोषण, बालमजुरी आणि बालविवाह यांसारख्या समस्यांवर वेळेत कारवाई करण्यात आली आहे. एक लाखांहून अधिक मुलांची सुटका: संकटात सापडलेल्या मुलांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्यात आणि त्यांच्या संरक्षणासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

**१०९८ हेल्पलाईनसाठी नागरिकांची जबाबदारी**

कोणत्याही समाजाचे भविष्य हे त्याच्या मुलांच्या सुरक्षिततेवर आणि विकासावर अवलंबून असते. म्हणूनच, प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे की, संकटात सापडलेल्या मुलांची मदत करण्यासाठी योग्य ती तक्रार १०९८वर नोंदवावी.

**आपण काय करू शकतो?**

सतर्क राहा : जर आपल्या आजूबाजूला बालकांचे शोषण, दुर्लक्ष किंवा अत्याचार होत असल्याचे आढळले, तर १०९८वर कॉल करा.

जागरूकता वाढवा: १०९८ चा प्रचार करून अधिकाधिक लोकांना या सेवेबद्दल माहिती द्या.

सहकार्य करा : प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांसोबत काम करून संकटात असलेल्या मुलांना मदत करा.


१०९८ चाइल्ड हेल्पलाइन ही भारतातील असंख्य संकटग्रस्त मुलांसाठी जीवनरेखा ठरली आहे. ही सेवा केवळ मदतीचा एक मार्ग नसून, बालकांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक मोठे पाऊल आहे.

मुलांचे संरक्षण हे केवळ सरकारचे काम नसून, समाजातील प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. आपण सर्वजण एकत्र येऊन १०९८चा योग्य वापर केल्यास अनेक निरपराध बालकांचे जीवन सुरक्षित आणि आनंदी बनवू शकतो. चला नांदेड जिल्ह्यातील या कामात मदत करूया! वंचित शोषित असाह्य मुले कुठे आढळल्यास एक शून्य नऊ आठचा उपयोग करूया!

**-प्रवीण टाके, नांदेड**

# चित्रपट अभिनेता प्राण कृष्ण सिकंद

प्राण हे भारतीय चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या पात्र अभिनेत्यांपैकी एक होते. त्यांचा जन्म १२ फेब्रुवारी १९२० रोजी दिल्ली येथे झाला. त्यांचे वडील दिवंगत लाला केवल कृष्णन सिकंद रस्ते आणि पूल बांधण्यासाठी सरकारी सिव्हिल कंत्राटदार असल्याने प्राण यांनी कपूरथळा, उन्नाव, मेरठ, देहरादून आणि रामपूर अशा वेगवेगळ्या ठिकाणी शिक्षण घेतले. प्राण यांनी लाहोरमध्ये छायाचित्रण शिकून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. एका चित्रपट निर्मात्याशी झालेल्या या संधीमुळे त्यांना १९४० मध्ये 'यमला जाट' चित्रपटात पहिला ब्रेक मिळाला.



१९४५मध्ये शुक्ला यांच्याशी प्राण यांचे लग्न झाले, त्यांना दोन मुले अरविंद आणि सुनील आणि एक मुलगी पिंकी होती. १९४७मध्ये फाळणीच्या वेळी प्राण मुंबईत आले आणि थोड्या संघर्षानंतर त्यांनी त्यांची चित्रपट कारकीर्द पुन्हा सुरु केली. त्यांनी ४००हून अधिक चित्रपटांमध्ये विविध भूमिकांमध्ये काम केले. खलनायक म्हणून, 'राम और श्याम'सारख्या चित्रपटांमध्ये लोक भीतीने थरथर कापत होते आणि त्यांचा द्वेष करत होते, तरीही 'उपकार' मधील चांगल्या, अविस्मरणीय 'मंगल चाचा' म्हणून त्यांच्यावर प्रेम करत होते. त्यानंतर त्यांनी राज कपूर, दिलीप कुमार, देव आनंद, राजेंद्र कुमार, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र ते संजय दत्त, सनी देओल आणि सलमान खान अशा विविध दशकांतील आघाडीच्या कलाकारांसोबत चित्रपटांमध्ये काम केले. त्यांच्या काळातील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या आणि सर्वाधिक मागणी असलेल्या पात्र अभिनेत्यांपैकी ते होते, त्यांनी काही सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक प्रशंसित चित्रपटांमध्ये काम केले.

क्रीडाप्रेमी आणि एक चांगला खेळाडू असल्याने त्यांचा स्वतःचा फुटबॉल संघ डायनॅमोस फुटबॉल क्लब होता ज्याला त्यांनी पन्नासच्या दशकात अनेक वर्षे वित्तपुरवठा केला. १२ जुलै २०13 रोजी त्यांचा मृत्यू झाला. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### बीएसएनएल, एमटीएनएल युजर्ससाठी लवकरच ४जी सेवा





बीएसएनएल आणि एमटीएनएलच्या युजर्सना लवकरच ४जी सर्व्हिस मिळू शकते. सरकारने या दोन्ही टेलिकॉम कंपन्यांसाठी तिजोरी उघडली आहे. भारत संचार निगम लिमिटेड लवकरच दिल्ली आणि मुंबईतील एमटीएनएल भागातही ४जी सर्व्हिसचा विस्तार केला जाणार आहे.


केंद्रीय मंत्रिमंडळाने सार्वजनिक क्षेत्रातील दूरसंचार कंपनीला सहा हजार कोटी रुपयांचे अतिरिक्त पॅकेज जाहीर केले आहे. हे पॅकेज सरकारी टेलिकॉम कंपनीच्या ४जी नेटवर्क विस्तारासाठी वापरले जाईल. दरम्यान, बीएसएनएल संपूर्ण भारतात वेगाने ४जी मोबाईल टॉवर बसवत आहे. अलीकडेच कंपनीने देशभरात ६५ हजारांहून अधिक नवीन ४जी मोबाइल टॉवर्स सुरू केले आहेत. कंपनीचे उद्दिष्ट वर्षाच्या पहिल्या सहामाहीत एक लाख ४जी मोबाईल टॉवर्स सुरू करण्याचे आहे.

बीएसएनएलच्या ४जी सर्व्हिसच्या लॉंचिंगसह ४जीची चाचणीदेखील सुरू होईल. कंपनीने यासाठी टाटा कंपनीसोबत भागीदारी केली आहे. सरकारकडून मिळालेल्या सहा हजार कोटी रुपयांच्या अतिरिक्त पॅकेजचा वापर भारतात ४जी नेटवर्क विस्तारासाठी केला जाईल. गेल्या वर्षी सरकारने अर्थसंकल्पात बीएसएनएलला ८० हजार कोटी रुपये देण्याची घोषणा केली होती. या बजेटचा वापर सरकारी दूरसंचार कंपनीच्या सर्व्हिसला रिव्हाईल करण्यासाठी केला जाईल.

गेल्या वर्षी जुलैमध्ये खाजगी टेलिकॉम कंपन्यांचे रिचार्ज प्लॅन महाग झाल्यानंतर लाखो युजर्सनी आपले नंबर बीएसएनएलकडे पोर्ट केले होते, परंतु खराब नेटवर्क कव्हरेजमुळे तीन महिन्यांनंतर युजर्स पुन्हा एकदा खाजगी कंपन्यांकडे वळले आहेत. सरकारी टेलिकॉम कंपनी आपले युजर्स टिकवून ठेवण्यासाठी आपले नेटवर्क वेगाने वाढवत आहे.

# पेशवाईतील मुत्सद्दी नाना फडणवीस

कोकणातून साताऱ्यात आल्यावर १७१४ साली साताऱ्च्या शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथांना पेशवेपदी नेमले. बाळाजी विश्वनाथांनी शाहू महाराजांकडे शब्द टाकून हरी भानू यांना फडणवीशी दिली, मात्र हरी भानू यांचे चार-पाच महिन्यात निधन झाले. त्यांच्यानंतर बाळाजी (बळवंत) यांच्याकडे फडणवीशी आली. ते दिल्लीच्या स्वारी असताना त्यांना दिल्लीत मारण्यात आले. त्यांच्यानंतर रामचंद्र फडणवीस झाले. त्यांचे १७२४ साली निधन झाले. त्यानंतर बाळाजी यांचे पुत्र जनार्दन यांच्याकडे फडणवीशी आली.



नाना फडणवीसाचे भानू घराणे आणि पेशव्यांचे भट घराणे यांचा संबंध अनेक वर्षांपासूनचा आणि पिढ्यांचा होता. बाणकोटच्या खाडी या दोन्ही घराण्यांशी संबंधित आहे. खाडीच्या उत्तरेस भट घराण्याचे श्रीवर्धन आणि दक्षिणेस भानू घराण्याचे वेळास.

जनार्दन फडणवीस आणि रखमाबाई यांच्यापोटी जन्मास आलेले बाळाजी जनार्दन म्हणजेच नाना फडणवीस होय. नाना फडणवीस यांचा जन्म १२ फेब्रुवारी १७४२ रोजी सातारा येथे झाला. राघोबा दादांबरोबर उत्तर हिंदुस्थानाच्या मोहिमेत जनार्दन फडणवीस यांचे निधन झाले. अत्यंत हुशार तल्लखबुद्धीच्या नाना फडणवीसांना त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर १७५६ साली फडणवीशी मिळाली. ते नानासाहेब

**निमित्त**

पेशव्यांबरोबर स्वारीवरही जाऊ लागले. १७५७ साली त्यांनी श्रीरंगपट्टणमच्या मोहिमेत भाग घेतला त्यानंतर पानिपतच्या मोहिमेत ते सदाशिवरावभाऊ आणि विश्वासरावांसह सहभागी झाले.

पानिपतच्या युद्धानंतर नानासाहेब पेशवे फार काळ जगले नाहीत. सहा महिन्यांतच त्यांचा २३ जून १७६१ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यानंतर थोरले माधवराव पेशव्यांनी वस्त्रे स्वीकारली. नाना फडणवीस आता माधवरावांबरोबर काम करू लागले.

पेशवे मोहिमेवर जाताना कारभाराची जबाबदारी, किल्लेकोट नानांच्या भरवशावर टाकून जात. पराक्रमापोटी ते मोहिमांमध्ये विजयी होत असले तरी त्याचे थोडे श्रेय नाना फडणवीसांनाही दिले पाहिजे, असे मत वासुदेवशास्त्री खरे नोंदवतात. मोहिमांना लागणारा पैसा, दारूगोळा वेळेच्या वेळेस नाना पाठवत आणि राज्याची काळजी घेत म्हणूनच या मोहिमा पेशव्यांना निर्धोकपणे पार पाडता येत असे ते खऱ्यांनी लिहून ठेवले आहे.

माधवरावांच्या कार्यकाळामध्ये नाना फडणवीसांकडे फडणीशीबरोबर अनेक जबाबदाऱ्या आल्या असे 'नाना फडणवीस अँड द एक्स्टर्नल अफेअर्स ऑफ द मराठा एंपायर' या पुस्तकाचे लेखक वाय. एन. देवधर यांनी लिहून ठेवले आहे. फडणीशी म्हणजे बजेटची आखणी, हिशेब ठेवणे, ऑडिट आणि पेशव्यांच्या राजधानी जबाबदारी पाहणे हे काम नानांकडे आले तसेच मोहिमांच्या वेळेचीही व्यवस्था त्यांच्याकडे आली. देवधरांच्या या शब्दांमधून नानांच्या वाढत्या दबदब्याचा अंदाज येतो.

माधवरावांनी राघोबादादांना शनिवारवाड्यात कैद करून ठेवले होते. त्यांच्यावर देखरेखीसाठी नाना फडणवीसांना नेमण्यात आले. २ एप्रिल १७६९ रोजी राघोबादादांनी शनिवारवाड्यातून पळून जाण्याचा प्रयत्न केला होता, मात्र नानांनी त्यांना पुन्हा पकडून बंदोबस्तात ठेवले. माधवरावांचा १७७२ साली क्षयामुळे मृत्यू झाला. (साभार : इंटरनेट)

## आरोग्य प्रहर

### बर्ड फ्लूचा प्रादुर्भावामध्ये अंडी खाणे सुरक्षित आहे का?



देशभरात बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे दुकानांमध्ये कोंबडी व अंड्यांचे अनेक रिकामे शेल्फ आढळत आहेत. परिणामत: लोकांना बहुतांशी नियमितपणे लागणाऱ्या अंड्यांच्या किमती वाढल्याने ग्राहकांमध्ये अंड्यांचा पुरवठा आणि त्यांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता निर्माण झाली आहे.

या टप्प्यावर तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, बर्ड फ्लूने संक्रमित अंडे किराणा दुकानात पोहचण्याची शक्यता कमी आहे. सार्वजनिक नियमांनुसार व्यावसायिकरीत्या पॅक केलेली अंडी धुऊन, निर्जंतुक करून पाठविणे आवश्यक आहे, ज्यामुळे अंड्याच्या कवचाच्या बाहेरील विषाणूचे कण काढून टाकण्यास मदत होते.


मृत पक्षी अंडी घालत नाहीत, असे वॉशिंग्टन, डी.सी. येथील पशुवैद्यकीय सार्वजनिक आरोग्यतज्ज्ञ व सल्लागार डॉ. गेल हॅन्सन यांनी सांगितले. जेव्हा विषाणू एखाद्या कळपाला प्रभावित करतो तेव्हा त्याची अंडी सामान्यतः अन्न पुरवठ्यातून काढून टाकली जातात.

जर योग्य पद्धतीने अन्न हाताळले जात असेल आणि शिफारशीप्रमाणे अंडी पूर्णपणे शिजवली वा उकडली जात असतील, तर धोका अत्यंत कमी आहे, असे जॉन्स हॉपकिन्स ब्लूमबर्ग स्कूल ऑफ पब्लिक हेल्थमधील पशुवैद्य व पर्यावरणीय साथीचे रोगतज्ज्ञ डॉ. मेघन डेव्हिस म्हणाल्या.

**अन्न सुरक्षित हाताळा**

कच्ची अंडी हाताळल्यानंतर हात व्यवस्थित धुवा. कच्ची अंडी जेथे हाताळली गेली, तेथील स्वयंपाक करण्याचा पृष्ठभाग आणि भांडे साबणमिश्रित पाण्याने स्वच्छ करा. फक्त बर्ड फ्लूचा धोका कमी करण्यासाठी नव्हे, तर अन्नातून होणारी संभाव्य विषबाधा टाळण्यासाठी कुकी किंवा केकसाठी वापरले जाणारे कच्चे पीठ चाखणे किंवा खाणे टाळा, कारण त्यात साल्मोनेलासारखे हानिकारक जंतू असू शकतात. लहान मुले, वृद्ध, गर्भवती महिला आणि रोगप्रतिकार शक्ती कमकुवत झालेल्या लोकांसारख्या असुरक्षित गटांसाठी ही खबरदारी घेणे विशेष महत्त्वाचे आहे.

## बातमीतील बात



# माणगाव आरटीओ कार्यालयासाठी तरतुदीची परिवहनमंत्र्यांकडे मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावजवळील मुगवली येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय नुकतेच मंजूर झाले आहे. मात्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी सरकारने अर्थिक तरतूद केलेली नाही. ही इमारत तातडीने बांधण्यासाठी अर्थसंकल्पात अर्थिक तरतूद करण्यात यावी अशी मागणी शिवसेना प्रवक्ते अ‍ॅड.राजीव साबळे यांनी सोमवार (दि.१०) रोजी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे लेखी पत्र लिहून केली आहे.



प्रादेशिक परिवहन कार्यालय झाल्यावर दक्षिण रायगड जिल्ह्यातील माणगाव, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, रोहा, पाली सुधागड या तालुक्यांतील वाहन चालक आणि मालक यांना निश्चितच लाभ मिळणार आहे. माणगाव हे जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने ९ तालुक्यातील वाहनचालक आणि मालक यांना येथे कामासाठी सोपे होणार आहे. तसेच माणगाव हे कमी अंतरावर आहे. त्यामुळे वेळ आणि पैशांची बचत होणार आहे.

सध्या प्रादेशिक परिवहन कार्यालय हे पेण येथे आहे. त्यामुळे बर्याचशा तालुक्यातील वाहनचालक यांना नाहक पायपीट करावी लागत आहे. तसेच अर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. पेण येथे जाण्यासाठी आणि येण्यासाठी १०० ते १५० किमी आहे. महामार्गावरील प्रचंड खड्डे आणि वाहतुक कोंडी समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या कार्यालयाची इमारत बांधकाम झाल्यावर सर्वांनाच सोयीस्कर आणि सोयीचे होणार आहे. इमारत बांधकाम करण्यासाठी अर्थिक तरतूद, आस्थापनेवरील विभागासाठी पद निर्मिती आणि टेस्ट ट्रेक तसेच काही अनुषंगिक बाबीं आणि कामांसाठी अर्थिक अनुदान देण्यात आलेले नाही. त्यामुळे हे कार्यालय मंजूर होऊनही वाहनचालकांना काहीच लाभ घेता येत नव्हता.

यापूर्वी माणगाव येथे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे शिबिर म्हणजेच आरटीओ कॅम्प विविध ठिकाणी भाड्याच्या जागेत होत होते. या अडचणी आणि गैरसोयी लक्षात घेऊन शिवसेना प्रवक्ते राजीव साबळे यांनी परीवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन प्रादेशिक परिवहन कार्यालय इमारत बांधकाम करण्यासाठी सरकारने येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात भरीव अर्थिक तरतूद करावी अशी मागणी केली.

याबाबत परीवहन मंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल शिवसेना प्रवक्ते राजीव साबळे यांनी आभार व्यक्त केले. त्यामुळे या प्रादेशिक परिवहन कार्यालय इमारत बांधकामाला गती प्राप्त होऊन वाहनचालकांना भविष्यात निश्चितच फायदा होईल असे शिवसेना प्रवक्ते अ‍ॅड. राजीव साबळे यांनी सांगितले.

# भाजप नेते किरीट सोमय्या यांचे माथेरान नगरीत स्वागत



**माथेरान : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या हे आपल्या कुटुंबासमवेत आवडत्या माथेरान पर्यटनस्थळी दोन दिवसांच्या विश्रांतीसाठी दाखल झाले आहेत.

माथेरान प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर त्यांचे आगमन होताच भारतीय जनता पक्ष शहर चिटणीस राजेश चौधरी आणि ज्येष्ठ कार्यकर्ते तथा माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी त्यांच्यासोबत ई-रिक्षा संघटनेचे पदाधिकारी देखील होते.

माथेरान नगरीत प्रवेश करतांना माथेरान शहरात सुरू झालेल्या पर्यावरण पूरक ई-रिक्षा प्रवासाचा त्यांनी आनंद घेतला. रेल्वे स्टेशन जवळील ई-रिक्षा थांब्यापासून आपल्या हॉटेल पर्यंत त्यांनी सर्वसामान्यांप्रमाणे पायी चालत प्रवास केला. पायी प्रवास करत असताना बाजार पेठ मधील मुख्य रस्त्यावरील निखळलेल्या क्ले-पेव्हर ब्लॉकबाबत नाराजी व्यक्त केली.

माथेरान मुक्कामी असलेले किरीट सोमय्या यांनी माथेरान मधील विविध समस्यांबाबत माहिती घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करून समस्या मार्गी लावाव्यात, असे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

# संरक्षण सेवेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

संरक्षण सेवेमध्ये अधिकारी म्हणून महाराष्ट्रातील युवक व युवती जास्त संख्येने यावे यासाठी राज्य शासनाने छत्रपती संभाजीनगर येथे मुलांसाठी व नाशिक येथे मुलींसाठी सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची स्थापना केलेली असून रायगड जिल्ह्यामधील युवक, युवतीनी या संकेतस्थळावर दि.२८ फेब्रुवारी २०२५ पूर्वी ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत) यांनी केले आहे.

यासाठीच्या पात्रता पुढीलप्रमाणे आहेत-अविवाहीत मुलगा/मुलगी, महाराष्ट्राचे अधिवासी अधिवासी प्रमाणपत्र, जन्म तारीख २ जानेवारी २०११ ते १ जानेवारीच्या दरम्यान, मार्च/ एप्रिल/मे २०२५ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत (दहावी) परीक्षेला व जून २०२५ इयत्ता अकरावीमध्ये प्रवेश घेण्यासाठी पात्र असावे.

## कागदपत्रे हरविलेबाबत

मी,श्रीमती. ताराबाई गबाजी गांगुर्डे, पत्ता : रा.ए टाईप/४३/५, शंकर मंदीराजवळ, सेक्टर १३, नवीन पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६

माझेकडून पनवेल परिसरात प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ००६९/२०२५ दिनांक. ८/२/२०२५ रोजी नोंद त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. रिसिप्त दस्त क्र.पवल ५०८६/२००१, अ‍ॅलॉटमेंट लेटर, पजेसन लेटर २१/१०/१९८२ हायर परचेस अ‍ॅग्रीमेंट दिनांक ०७/०१/१९८५ वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी खालील नंबरवर ८७७९१२९४९५ संपर्क साधावा.

**दिनांक :- ११/०२/२०२५**

सही/-
श्रीमती. ताराबाई गबाजी गांगुड

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय :-२७४५८०४०/४१/४२ ई मेल:- panvelcorporation@gmail.com
अग्निशमनविभागः- २७४६१५०० फॅक्स नं:- ०२२-७४५२२३३

कार्यालय जा.क्र./पमपा/अग्नि/२६२१/प्र.क्र.१६/३०६/२०२५ दिनांकः-११/०२/२०२५

| अ.क्र | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | क्र./पमपा/अग्नि/२६२१/प्र.क्र.१६/३०६/२०२५ दिनांकः-११/०१/२०२५ | पनवेल महानगरपालिका अग्नीशमन आपत्ती व्यवस्थापन विभागाकरीता साहीत्य खरेदी करणेबाबत. |

या निविदेबाबतची विस्तृत माहीती शासनाच्या http://mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १२/०२/२०२५ ते दिनांक २७/०२/२०२५ रोजी दुपारी ०३:०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. याची नोंद घ्यावी.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ५८/५८/२०२५**
**दिनांक :- ११/०२/२०२५**

**सही/-**
**उपायुक्त मुख्यालय (I)**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहिर नोटीस

आमचे अशिल श्री अकील यु. अधिकारी, रा. बाजी मोहल्ला, ३०१, अझीझ अपार्टमेंट, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड जे श्री. नरेंद्र विशिन अडवाणी याचे नियुक्त अखत्यारी आहेत यांचे सांगण्यावरून तसेच त्यांनी दिलेल्या माहितीवरून व अमाचे अवलोकनार्थ प्रस्तुत केलेल्या कागदपत्रांवरून आम्ही श्री अनिल वि. कर्णिक, अ‍ॅडव्होकेट पनवेल तमाम जनतेस जाहिर करीत आहोत ते खालीलप्रमाणे:

मौजे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ७४४/२, क्षेत्र ००.५२.०६ (५२६० चौमी) ही मिळकत ही केंद्र शासनाकडून श्री हरकिसनदास भूमनलाल यांचे नावे ईतर काही जमिनींवरोवर ता.०८.०८.१९५६ रोजी ईव्हॅक्यू अ‍ॅक्टमधील तरतूदींप्रमाणे अ‍ॅलॉट करण्यांत येवून त्यांचे ताबा वहिवाटीत हस्तांतरीत करण्यांत आली होती. सदरील श्री हरकिसनदास भूमनलाल यांनी त्यांना अलॉट करण्यांत आलेल्या अ‍ॅलॉटमेट नं. KOL २६४१०७१-७२ मधील मिळकती त्यांनी त्यांच्या मुलीचे पती श्री. विशिन डी अडवाणी यांना दि.१०.११-१९६८ चे मृत्यूपत्राने बहाल केली होती. सदरील हरकिसनदास भूमनलाल यांचे मृत्यूपश्चात सदरची मिळकत ही श्री विशिन डी. अडवाणी यांच्या मालकी कब्जात व ताव्यांत आली होती. कै. विशिन डी. अडवाणी यांचे मृत्यूपश्चात नोटीसीत नमूद केलेली मिळकत त्यांचे एकमेव वारस श्री नरेंद्र विशिन अडवाणी यांचे मालकांची झाली असून ती त्यांचे मालकी ताचेकब्जांत आहे व त्या मिळकतीत त्यांचे नावाचा फलक देखील लावण्यात आला आहे तसेच सदरील सर्व्हे नं. ७४४/२ संबंधात सेटलमेंट ऑफिसर महसूल खाते आणि मा. तहसिलदार पनवेल याचे समोरील प्रकरणांत जे काही आदेश अथवा सर्क्युलर्स पारीत केले गेलेले आहेत त्यास आव्हाहन देणारी याचिका श्री. नरेंद्र विशिन अडवाणी यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे न्यायालयांत रिट पिटीशन नं.३१०३/१९९५ दाखल केली असून सदरचे प्रकरण हे अंतिम चौकशी करीता मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे समोर पलचित आहे. सदरचे प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे समोर ता.०३.०२.२०२५ रोजी नेमण्यांत आले होते व त्यानंतर त्या तारखेस सदरची याचिका ही पुढील तारखेस अंतिम चौकशीकरीता नेमण्यांत आली आहे. सदर याचिकेमध्ये श्री. राजेंद्र एन. बोहरा व ईतर हे सामनेवाले आहेत. सवव त्यांना सदरील रिट पिटीशन क.३१०३/११९५ संबंधात पूर्ण माहिती आहे. सदरील श्री बोहरा यांनी त्यांचे वकील अ‍ॅड-प्रशांत भुजबळ, पनवेल यांचेमार्फत दैनिक रामप्रहर, गुरूवारचा अंक दि.०४-११-२०२१ मध्ये सदरील मिळकती संबंधात जाहिर नोटीस प्रसिध्द करून हरकती भागविल्या होत्या त्याकामी आमचे अशिलांनी त्यांची योग्य व समर्पक हरकत त्यांचे वकीलांमार्फत अ‍ॅड- प्रशांत भुजबळ यांचेकडे पाठविली होती व त्याचप्रमाणे सदर हरकतीची कल्पना संबंधित ईसमाना व्हावी म्हणून त्यांची जाहिर हरकत पनवेल येथून प्रसिध्द होणा-या दैनिक रामप्रहर व दैनिक किल्ले रायगड या वर्तमानपत्रांमध्ये सन २०२१ व ता.१८.१२.२०२३ रोजी दाखल प्रसिध्द केल्या होत्या सदरची मिळकत ही श्री. नरेंद्र विशिन अडवाणी यांचे ताब्यांत असताना श्री. राजेंद्र एन् बोहरा यांनी पनवेल महानगरपालिकापरिषदेकडे सदर मिळकतीत बांधकाम करण्याकरीता बांधकाम आराखडा सादर केला आहे असे श्री. नरेंद अडवणी यांचे अखत्यारी श्री अकील यु. अधिकारी यांना माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेल्या माहितीवरून समजले आहे वस्तुतः सदरील श्री. राजेंद्र एन. बोहरा यांना तशाप्रकारचा कोणताही बांधकाम आराखडा अथवा त्या बांधकामास परवानगी मिळणेकरीता अर्ज करण्याचा कोणताही कायदेशिर अधिकार प्राप्त होत नाही. त्याचप्रमाणे श्री. नरेंद्र डी. अडवाणी यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क.३१०३/१९९५ चे प्रकरणांत आव्हाहनित केलेल्या व त्यासंबंधात निर्णय मा उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून पारीत होणार आहेत. याप्रमाणेची परिस्थिती असल्यामुळे आमचे अशिल हे त्यांच्या हिताचे संरक्षणाकरीता तमाम जनतेस जाहिर करीत आहेत की, सदर सर्वो नं.७४४/२ या मिळकतीस श्री. राजेंद्र एन बोहरा, श्रीमती विजकला जगदीश बोहरा, श्रीमती पांजली जयपकाझ बोहरा, श्रीमती शिला किसन बोहरा, श्रीमती श्रध्दा जगदीश बोहरा यांनी कोणत्याही प्रकारचे बांधकाम करून त्रयस्थ ईसमांना सदनिका खरेदी देण्याचे व्यवहार केल्यास त्या व्यवहारास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. तसेच तशाप्रकारचे कोणतेही सदनिका हस्तांतरणाचे व्यवहार झाल्यास त्याची कोणतीही जवाबदारी आमचे अशिलांवर राहणार नाही व ते सर्व व्यवहार रद्दबातल स्वरूपाचे ठरतील याची स्पष्ट नोंद तमाम जनतेने त्यांचे हिताकरीता घ्यावी हे सर्वास जाहिर व्हावे.

**सही/-**
**अँड. अनिल वि. कर्णिक**
**पत्ता: फ्लॅट नं.००३, शीतल दर्शन अपार्टमेंट, तळमजला, बागेश्री को-ऑप सोसायटी समोर, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

## सिडको

शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

**नगर रचना परियोजना क्र. ४**

**नगर रचना परियोजना (टि.पी.एस.) - ४ मध्ये समाविष्ट जमिनमालक/शेतकरी/खातेदार यांचे मालकीहक्क व ओळखीचे पुरावे/कागदपत्रे सादर करणे बाबत.**

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१७१२/४७५/सी.आर.९८/नवि-१२ दि. १० जानेवारी, २०१३अन्वये नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्र (NAINA) च्या अधिसुचित क्षेत्रासाठी शहर व औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र (सिडको) ची, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४०(१) (ब) नुसार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे.

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१७१७/एमआयएस/२७५०/सी.आर-९१/२०१९/नवि-१२, दि. १६.०९.२०१९ अन्वये नैना क्षेत्राचा विकास आराखडा मंजूर केलेला आहे. सदर विकास आराखडा नगर रचना परियोजना (टि.पी.एस.) च्या माध्यमातून विकसित करण्याचा निर्णय सिडकोने घेतलेला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० (१) अन्वये मंजूर अंतरीम विकास आराखड्याच्या क्षेत्रातील मौजे आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग), शिलोत्तर रायचूर (भाग) व पालीदेवद (भाग) या गावांतील अंदाजे ३५० हेक्टर क्षेत्राकरीता नगररचना परियोजना क्रमांक - ४ करण्याचा उद्देश सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ०७ जून, २०१९ रोजीच्या ठराव क्रमांक १२१८९ अन्वये घोषित करण्यात आला आहे.

नगर रचना परियोजना (टि.पी.एस.)-४ च्या प्राथमिक योजनेला शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१२२४/०३/प्र.क्र.२०/२४/नवि-१२, दि. २८.०२.२०२४ अन्वये मान्यता दिली आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार योजनेतील सर्व जमिनधारकांसाठी मा. लवादाने अंतिम भूखंड निश्चित केले आहेत. सदर अंतिम भूखंड व नगररचना परियोजनेशी संबंधीत माहीती https://cidco.maharashtra.gov.in/naina/naina वर उपलब्ध आहे. सदर वेबसाईटचा QR Code खाली दर्शवण्यात आला आहे. सबब सदर योजनेत समाविष्ट असणाऱ्या जमिनधारकांनी खालील नमूद कागदपत्रे **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नैना)** यांचे कार्यालयात सादर करावे जेणेकरून अंतिम भूखंड हस्तांतरित करणे सुलभ जाईल असे या जाहिर सूचनेद्वारे आपणांस कळविण्यात येत आहे.

**आवश्यक कागदपत्रे/पुरावे :-**

**१) पॅन कार्ड, आधार कार्ड/ मतदान ओळखपत्र**
**२) अद्ययावत ७/१२ उतारे व फेरफार उतारे**
**३) पासपोर्ट साईज फोटो (शेतकरी/जमीनमालक/भूधारक)**

**कार्यालय पत्ता : मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नैना) यांचे कार्यालय, २ रा मजला, टॉवर क्र. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४**

CIDCO NAINA TPS4

**(समाधान खटकाळे)**
**उप सचिव तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नैना)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/४४८/२०२४-२५

## म्हसळा नगरपंचायत म्हसळा

### खरेदी दरपत्रक नोटीस २०२४-२५ (कर विभाग)

IWBP प्रणाली मध्ये मालमत्ता व पाणी जोडणीची डेटा एंट्री करणेकामी म्हसळा नगरपंचायत पी बी डब्ल्यू इच्छुकांकडून दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची मुदत |
|---|---|---|
| १ | आय. डब्ल्यू. बी. पी. संगणक प्रणाली मध्ये मालमत्ता व पाणी जोडणीची डेटा एंट्री करणे | ३० दिवस |

**दरपत्रक अटी / शती :-**

१. उपरोक्त कामी इच्छुकांने स्वतःचे फर्मचे लेटरपॅडवर आपले दरपत्रक हि नोटीस प्रसिद्ध झालेचे दिनांकापासून १७/०२/२०२५ रोजी सायंकाळी ०४:०० वाजेपर्यंत सीलबंद लखोट्यांत देणेत यावे.
२. विहित दरपत्रक वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोटयात सादर करणे आवशयक आहे.

**लखोटा क्र. १ मध्ये -**

अ) शॉप ऍक्ट नोंदणी दाखला किवा शॉप ऍक्ट इंटीमेशन रीसिप्ट किंवा उद्योग आचार किंवा इनकोर्पोरेशन दाखला, ब) पॅन कार्ड, क) जी.एस.टी. सर्टिफिकेट, ड) परिशिष्ट अ

**लखोटा क्र. २ मध्ये -** आपले लेटरहेडवर स्वच्छ अक्षरात, खाडाखोड न करता, अतिरिक्त अटी-शर्ती नमूद न करता अंकात व अक्षरी दर भरून, स्वक्षांकित करून कोटेशन सीलबंद लखोटयात सादर करावे.

३. प्राप्त दरपत्रके दिनांक १७/०२/२०२५ रोजी सायंकाळी ०४:०० वाजता इच्छुक ठेकेदार/त्यांच्या प्रतिनिधीसमोर उघडणेत येईल.
४. दरपत्रकांमध्ये नमूद केलेले दर हे सर्व करांसहित असावेत. कोणताही अतिरिक्त कर अनुज्ञेय राहणार नाहीत.
५. शासकीय लेखा परीक्षणात संबंधित दरपत्रकेसंदर्भित कोणतेही आक्षेप अथवा अनियमितता आल्यास ती कागतपत्रे सादर करून त्याची पूर्तता करणे तसेच कोणतीही वसूली निघाल्यास ती भरणा करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील याची नोंद घ्यावी.
६. कोणतेही कारण नमूद करून अथवा कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व दरपत्रके स्वीकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवला आहे.
७. सादर केलेल्या बिलातून १% आयकर व १% जी.एस.टी. कपात करणेत येईल.
८. सदर कामामध्ये पुढील प्रकारच्या नोंदीचा समावेश आहे. सदर नोंदीचा विचार करूनच दर सादर करावेत.

- मालमत्ता नोंदी - ४३५९ मालमत्ता विशिष्ट माहिती - ४३५९ मालमत्ता थकबाकी - ४३५९
- मालमत्ता चालू वर्षाची बिल नोंद - ४३५९
- पाणी जोडणी नोंदी - १७२८ पाणीपट्टी थकवाकी १७२८ पाणीपट्टी चालू वर्षाची बिल नोंद - १७२८

**जा.क्र २०२२ म्हनप/२०२४ -२५**
**म्हसळा नगरपंचायत कार्यालय, म्हसळा,**
**जिल्हा - रायगड, दिनांक : ११/०२/२०२५**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**म्हसळा नगर पंचायत**

**सही/-**
**नगराध्यक्ष**
**म्हसळानगरपंचायत**

## E -TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000034761**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-40/ 2024-2025.**<br>RFx e-tender for supply of manpower with two wheeler for ground patrolling of underground cable route of 220kV Ulwe-Waghivali I & II line for finding of any digging/ excavation/ construction activity by various utilities and providing & fixing of route marker at 50 meters on underground cable route of 220kV Ulwe-Waghivali I & II line under EHV O&M Division Panvel**....3rd call.**<br>**Tender amount Rs. 28,95,836/-, EMD amount Rs. 28,958/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **11.02.2025, 18:00 Hrs. to 21.02.2025, 10:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 21.02.2025 up to 10:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **21.02.2025 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Mobile No. 9769213818.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

## जाहिर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दावा नोटीस ज्या अर्थी महावीर मॅजेसटी को-ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड. घोट, तालुका पनवेल, जिल्हा- रायगड या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील सभासदांनविरुद्ध थकीत मेन्टेनन्सचा भरणा केलेला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली तथापि खालील नमूद सभासदांना सुनावणी नोटीस पोहोच होत नसल्याने तसेच नोटीस पोहोज गैर अर्जदार हजर राहिले नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटिसीव्दारे आपणांस पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम दिनांक. २४/०२/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणी आपण स्वतःचा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही व अर्जाची सुनावणी एकतर्फी चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी

| अ.क्र | दावा क्रमांक | गैरअर्जदार | फ्लॅट न | कर्ज प्रकार | थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | ३५०/२०२४ | Shahjahan Shaikh/Abdul Shaikh | १ A/४०१ | मेन्टेनन्स | २२०६०/- |
| २. | ३५१/०२४ | Jaiwant Gaikwad/Neena Gangawane | १ B/१०३ | मेन्टेनन्स | ९३४९३/- |
| ३. | ३५२/२०२४ | Ravindra Murlidhar/Surekha Ade | १ B/२०४ | मेन्टेनन्स | १,०५,६९१/- |
| ४. | ३५३/२०२४ | Anurag Thakur/Sadhana Thakur | १ B/४०४ | मेन्टेनन्स | १८४८०/- |
| ५. | ३५४/२०२४ | Ganesh Gondkar/Jyoti Gondkar | १ C/१०२ | मेन्टेनन्स | २६८१४/- |
| ६. | ३५५/२०२४ | Bajirao Jadhav /Sangeeta Jadhav | १ C/१०४ | मेन्टेनन्स | १३२५६/- |
| ७. | ३५७/२०२४ | Deepti Alias/Deepti Ghadage | २ A/२०१ | मेन्टेनन्स | ४०६३६/- |
| ८. | ३५८/२०२४ | Ramswarath Vishwakarma | २ A/२०३ | मेन्टेनन्स | ४९१४९/- |
| ९. | ३५९/२०२४ | Lubani Bhingare/Nikhil Bhingare | २ A/३०२ | मेन्टेनन्स | १,०५,६९१/- |
| १०. | ३६०/२०२ | Aparna Shastry/Vineet Shastry | २ A/३०३ | मेन्टेनन्स | ५०५९/- |
| ११. | ३६१/२०२४ | NAVNATH KADAM | २ A/४०१ | मेन्टेनन्स | १८०८२/- |
| १२. | ३६२/२०२४ | Johsnon Noranha/Surekha Noronha | २ A/४०४ | मेन्टेनन्स | १,०५,६९१/- |
| १३. | ३६३/२०२४ | Chandrashekhar Dawal/Anant Dawal | २ B/१०१ | मेन्टेनन्स | ३४४०६/- |
| १४. | ३६४/२०२४ | Rajani Kurup/Nikita Kurup | २ B/१०४ | मेन्टेनन्स | ३४९९१/- |
| १५. | ३६५/२०२४ | Priyanka Poojari | २ B/३०१ | मेन्टेनन्स | ५०५९/- |
| १६. | ३६६/२०२४ | Anup Shede / Senha Shende | २ B/३०२ | मेन्टेनन्स | १६७२८/- |
| १७. | ३६७/२०२४ | Vilas Lokhande/Pramila Lokhande | २ B/४०१ | मेन्टेनन्स | १,०५,६९१/- |
| १८. | ३६८/२०२४ | Kiran Thorat/Ashish Thorat | २ C/१०२ | मेन्टेनन्स | १,०५,६९१/- |
| १९. | ३६९/२०२४ | Mukesh Misshra/Poonam Mishra | २ C/१०३ | मेन्टेनन्स | ८३००२/- |
| २०. | ३७०/२०२४ | Santosh Ubhare/Chitali Ubhare | २ C/४०३ | मेन्टेनन्स | ५७४५४/- |
| २१. | ३७५/२०२४ | Dr. Ashish Gupta | ३ A/२०३ | मेन्टेनन्स | ७३६०/- |
| २२. | ३७४/२०२४ | Rita Das | ३ A/३०३ | मेन्टेनन्स | १,१०,५५१/- |
| २३. | ३७३/२०२४ | Abdul Gaffar | ३ B/२०३ | मेन्टेनन्स | ४६३४२/- |
| २४. | ३७२/२०२४ | Pradeep Narode/Manu Narode | ३ B/३०१ | मेन्टेनन्स | २२०२८/- |
| २५. | ३७६/२०२४ | Kadambari Gamre | ३ B/४०३ | मेन्टेनन्स | ३८७७३/- |
| २६. | ३७७/२०२४ | Samad Mia / Afruza Khatun | ३ C/१०३ | मेन्टेनन्स | ८३६५३/- |
| २७. | ३७१/२०२४ | Nuzhat Qureshi /Afnan Qureshi | ३ C/३०२ | मेन्टेनन्स | १२९८०/- |
| २८. | ३८१/२०२४ | Madhuri Patil/Rajendra Patil | ३ C/४०२ | मेन्टेनन्स | ४७३९३/- |
| २९. | ३८०/२०२४ | Deviprasad Mishra/Balmiki Mishra | ४ A/१०४ | मेन्टेनन्स | १३९५२/- |
| ३०. | ३७८/२०२४ | Zakki Mansoori/Suhana Mansoori | ४ A/२०४ | मेन्टेनन्स | ७७१३८/- |
| ३१. | ३८५/२०२४ | M/s Mahaavir Imex | ४ A/४०३ | मेन्टेनन्स | ९००४७/- |
| ३२. | ३८४/२०२४ | Elavarsy Duraipandian/Meena Jeevanadham | ४ B/२०३ | मेन्टेनन्स | ५२२९१/- |
| ३३. | ३८३/२०२४ | Galla Hulda /Galla Raju | ४ B/३०४ | मेन्टेनन्स | ९००११/- |
| ३४. | ३८२/२०२४ | Hemangini Chaudhari Alies/Hemangini Kurkure | ४ B/४०१ | मेन्टेनन्स | २५३४९/- |
| ३५. | ३८९/२०२४ | Santosh Yadav/Komal Yadav | ४ C/१०३ | मेन्टेनन्स | ९००४७/- |
| ३६. | ३८८/२०२४ | Krishnanand Bacha Jha/Durga Jha | ४ C/१०६ | मेन्टेनन्स | ७००३८/- |
| ३७. | ३८७/२०२४ | Rajeshnant Tiwari/Vibha Tiwari | ४ C/२०१ | मेन्टेनन्स | ९२२८२/- |
| ३८. | ३८६/२०२४ | Naresh Shetty/Surekha Shetty | ४ C/४०४ | मेन्टेनन्स | ४१३०८/- |

**जा.क्र. ०५०७/२०२५**
**दि.११/०२/२०२५**

**सही/-**
**(भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल, रायगड**


# नवी मुंबई बनणार जागतिक शैक्षणिक केंद्र

## आंतरराष्ट्रीय एज्युसिटी प्रकल्पाचा प्रारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोतर्फे दावोस, स्वित्झर्लंड येथील जागतिक आर्थिक परिषदेमध्ये चार ऐतिहासिक सामंजस्य करार करण्यात आले असून या करारांद्वारे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. सदर सामंजस्य करार पूर्णत्वास नेण्यामध्ये विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी मोलाची भूमिका बजावली.

यापैकी दोन महत्त्वाकांक्षी सामंजस्य करार (एमओयु) एरुडिटस आणि बुक माय शो यांच्यासोबत करण्यात आले असून हे करार नवी मुंबईच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. एरुलर्निंगसोबत करण्यात आलेल्या सामंजस्य कराराद्वारे १० वर्षांत रु. २० हजार ते २५ हजार कोटींची गुंतवणूक होणे प्रस्तावित असून प्रत्यक्ष रोजगाराच्या २० हजार संधी निर्माण होणार आहेत. बुक माय शो सोबत करण्यात आलेल्या सामंजस्य कराराद्वारे रु. १ हजार ७०० कोटींची गुंतवणूक येऊन राज्यामध्ये आऊटडोअर एन्टरटेनमेन्ट अरिना विकसित करण्यात येणार आहे व याद्वारे राज्यात रोजगाराच्या ५०० संधी निर्माण होणार आहेत.



सिडकोतर्फे नवी मुंबईतील पहिल्या एज्युसिटीचा प्रारंभ करण्यात आला असून याद्वारे जगभरातील ८-१० नामांकित विद्यापीठे येथे एकत्र येणार आहेत. या जागतिक दर्जाच्या प्रकल्पाकरिता सिडकोने मध्यवर्ती भूमिका बजावली आहे. नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय एज्युसिटी हे जागतिक शिक्षण केंद्र बनणार असून जगभरातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षकांकडून शिकण्याची संधी मिळणार आहे. जागतिक दर्जाचे शिक्षण केंद्र उभारण्यासाठी सिडको कटिबद्ध असून या प्रकल्पाकरिता सिडकोतर्फे आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाभोवतीच्या ५ किलोमीटरच्या परिसरात मोक्याची जागा निश्चित करण्यात आली आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाद्वारे चैतन्यमय शैक्षणिक समाज निर्माण करण्यासह भिन्न पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये बहुसांस्कृतिक आदान-प्रदान आणि सहयोग वृद्धिंगत करण्याचे उद्दिष्ट आहे. या एज्युसिटी उपक्रमाद्वारे नवी मुंबई हे ८-१० परदेशी विद्यापीठांच्या सहयोगाद्वारे देशातील पहिले आंतरराष्ट्रीय विद्यापीठक्षेत्र (ख म्हणून उदयास येणार आहे. या प्रकल्पाद्वारे नवी मुंबईला वेगळी ओळख मिळण्यासह नवी मुंबईच्या विकासासही गती मिळणार आहे.

सिडकोतर्फे न्यूयॉर्क येथील सुप्रसिद्ध मॅडिसन स्क्वेअर आणि लंडन येथील ०२ अरिना यांच्या धर्तीवर अत्याधुनिक दर्जाचा आउटडोअर एन्टरटेनमेन्ट अरिना (मध्यमंच नाट्यगृह) नवी मुंबई येथे नियोजित आहे. या ठिकाणी संगीतसभा, क्रीडा, नाट्य इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन भिन्न अभिरुची असणाऱ्या प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याकरिता मध्यमंच नाट्यगृह सज्ज असणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सान्निध्यामध्ये उदयास येणारी आंतरराष्ट्रीय एज्युसिटी ही एरोसिटी, स्पोर्टस सिटी, मेडिसिटी, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, प्रस्तावित परिवहन मार्गिका इ. महत्त्वाच्या प्रकल्पांपासून देखील नजीकच्या अंतरावर असणार आहे. देशातील पहिली आंतरराष्ट्रीय एज्युसिटी असणारा हा प्रकल्प भविष्यातील शैक्षणिक केंद्रे, भावी पिढ्यांकरिता विकास, रोजगार आणि संधी निर्माण करण्याकरिता प्रारुप ठरणार आहे.

### सामंजस्य करार वाढवणार रोजगार

राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती देणारे आणखी दोन सामंजस्य करार सिडकोतर्फे करण्यात आले आहेत. यापैकी एक सामंजस्य करार हा बांधकाम क्षेत्रातील अग्रणी पंचशील रिअल्टी या विकासकासोबत करण्यात आला असून याद्वारे २५,००० रुपये कोटींची गुंतवणूक करून सिडको अधिकार क्षेत्रामध्ये डेटा सेंटर विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. दुसरा सामंजस्य करार नामांकित उद्योग समूह असलेल्या वेलस्पन वर्ल्डसोबत करण्यात आला असून याद्वारे लॉजिस्टिक्स पार्क क्षेत्रात एक हजार ५०० कोटींची गुंतवणूक प्रस्तावित आहे व प्रत्यक्ष रोजगाराच्या दोन हजार संधी निर्माण होणार आहेत.

*या ऐतिहासिक करारांद्वारे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळून येणाऱ्या पिढ्यांकरिता विकास आणि रोजगार संधी निर्माण करण्याकरिता हा प्रेरक घटक ठरणार आहे. अभिनव आणि शाश्वत विकासाप्रति असलेल्या सिडकोच्या कटिबद्धतेमुळे महाराष्ट्राला उद्योग, मनोरंजन आणि शैक्षणिक केंद्र होण्याचा बहुमान लाभणार आहे. या ऐतिहासिक करारांमुळे नवी मुंबईचे परिवर्तन घडण्याबरोबरच देशाच्या विकासाकरिताही योगदान मिळणार आहे.*

**-विजय सिंघल,**
उपाध्यक्ष, सिडको



## शिवजयंती मिरवणूक नियोजन बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती बुधवारी (दि.१९) निमित्ताने लोकसहभागातून महानगरपालिकेच्या सहकार्यातून पनवेल शहरामध्ये भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात येणार आहे. पनवेल शहरामधील मिरवणूकीच्या नियोजनाची बैठक आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार सोमवारी (दि.१०) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये घेण्यात आली.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, रविकिरण घोडके, पोलीस निरीक्षक पटेल, वाहतुक निरीक्षक मनोज महाडिक, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी राजू पाटोदकर, महापालिका अधिकारी व कर्मचारी, माजी नगरसेविका, नगरसेवक, विविध जयंती मंडळाचे प्रतिनिधी, विविध शाळांचे प्रतिनिधी, विविध शासकीय संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावर्षी महापालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. याचे नियोजन आजच्या बैठकित करण्यात आले. यानिमित्ताने लेझीम पथक, चित्ररथ, ढोल पथक, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा यांची स्पर्धा होणार आहे. या मिरवणूकीमध्ये विविध शाळांनी, संस्थानी सहभागी होण्याचे आवाहन महापालिकेने केले असून आपल्या सहभागाची पूर्व नोंदणी महापालिकेकडे करणे गरजेचे असल्याचे उपायुक्त कैलास गावडे यांनी या वेळी सांगितले.

याबरोबरच सहाय्यक पोलीस निरीक्षक पटेल यांनी छत्रपती शिवाजी महाराज भव्य मिरवणूकीस सर्व नागरिकांनी शांततामय वातावरणात सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच नागरिकांच्या सूचना लक्षात घेऊन स्वच्छता विभाग, सुरक्षा विभागास, विद्युत विभागास छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिवशी चोख व्यवस्था ठेवण्याबाबत यावेळी सूचित केले.

१९ फेब्रुवारी रोजी सकाळी सात वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून मिरवणूकीची सुरूवात होईल. हुतात्मा स्मारक चौक, आदर्श लॉज, गावदेवी मंदिर, सावरकर चौक, मनपा मुख्यालय, सेवा योजन कार्यालय, मौलाना आझाद चौक मार्गे मिरवणूकीचा शेवट टपाल नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळा चौकामध्ये होईल. त्यानंतरचे कार्यक्रम आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये होणार आहेत. यामध्ये 'शिवराज्य' नाट्याविष्कार होणार असून याचबरोबर, मिरवणूकीमध्ये सहभागी स्पर्धकांमधून विजेत्या स्पर्धकांची नावे घोषित करून त्यांना सन्मानित करण्यात येईल.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचा खर्च लोकसहभागतून केला जाणार आहे. नागरिकांनी या मिरवणूकीसाठी लोकवर्गणी देण्यासाठी महापालिकेशी संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने या वेळी करण्यात आले.

## शिक्षण प्रसारक विद्यालयाचे विज्ञान प्रदर्शनात यश

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नेरूळ येथील एन.आर. बी. एज्युकेशनल सोशल अँड कल्चरल ट्रस्ट संचलित शिक्षण प्रसारक विद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील असते. त्यामुळे या शाळेचे विद्यार्थी विविध शैक्षणिक उपक्रमात भरीव कामगिरी करत असतात.



नुकतेच दिनांक ७ फेब्रुवारी २०२५ रोजी राकेश जैन हायस्कूल शिवकर पनवेल येथे सेवा सहयोग फाउंडेशन यांच्यातर्फे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.या विज्ञान प्रदर्शनात नवी मुंबई आणि पनवेल परिसरातील ५० शाळा सहभागी झाल्या होत्या.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी गोडी निर्माण व्हावी आणि या विद्यार्थ्यातूनच भावी शास्त्रज्ञ निर्माण व्हावेत या उद्देशाने विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या विज्ञान प्रदर्शनात शिक्षण प्रसारक विद्यालय माध्यमिक नेरूळ, नवी मुंबई या शाळेतील कार्तिक इंगोले, करण गजभार, रोहित म्हात्रे या विद्यार्थ्यांनी सुरक्षा विजेच्या धक्क्यापासून या प्रकल्पाला माध्यमिक गटातून पहिला क्रमांक मिळाला. या प्रकल्पाची संकल्पना आणि मार्गदर्शन विज्ञान शिक्षक शेखर जगताप यांचे होते. प्राथमिक विभागातून देखील शिक्षण प्रसारक विद्यालयाच्याच सुरक्षित लोकल प्रवास या प्रकल्पाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. वृषाली परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रेया सगळे, रिया पाटेकर, समृद्धी सोनटक्के या विद्यार्थिनींनी हा प्रकल्प सादर केला होता.

या वेळी सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्कारदेखील शिक्षण प्रसारक विद्यालय नेरूळ नवी मुंबई या शाळेला देण्यात आला.

शाळेच्या या उत्तुंग यशाबद्दल शिक्षण प्रसारक विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष नामदेव भगत, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका प्राजक्ता कोठेकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वंदना पाटील आणि शाळेतील सर्व शिक्षकांनी शाळेच्या बालवैज्ञानिकांचे कौतुक आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

## सीकेटी विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागाचे कब-बुलबुल शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्य रुजवण्यासाठी कब-बुलबुल शिबिर आयोजित करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या हस्ते नारळ वाढवून व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. शिबिराची सुरूवात कब - बुलबुलच्या प्रार्थनेने झाली. शिबिरात विविध गाणी, गोष्टी, खेळ, चित्रकला, सांस्कृतिक कार्यक्रम, गप्पागोष्टी आदींचे सादरीकरण करण्यात आले.



खरोखरच हे एक दिवसीय शिबिर हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील स्मरणीय ठेवा ठरेल आणि ह्या वयात विद्यार्थ्यांना मिळालेली शिस्त आणि स्वयंप्रेरकतेचे धडे हे आयुष्यभर लक्षात राहतात म्हणूनच अश्या शिबिरांचे आयोजन करण्यात आले असे आपल्या भाषणातून मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी व्यक्त केले.

या वेळी शिबिरामध्ये पल्लव आशिष म्हात्रे ह्या विद्यार्थ्याला बेस्ट कब तसेच स्वरा दादा जाधव ह्या विद्यार्थिनीला बेस्ट बुलबुल म्हणून सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सर्व पालकांनी शाळेने राबविलेल्या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सहभागाची संधी दिली त्यामुळे शाळेचे, मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी तसेच कब बुलबुल प्रशिक्षक सुरेंद्र ठमके, वर्ग शिक्षिका बीना नायर, प्रिया नायर तसेच लथा बालसुब्रमानियन व इतर सर्व शिक्षकांचे व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे कौतुक करत आभार मानले.

## सारडे गावात घरांच्या मोजणीसंदर्भात कार्यक्रम



**उरण : बातमीदार**

सारडे ग्रामविकास समितीच्या वतीने रविवारी (दि.९) समिती कार्यालयात सारडे गावातील घरांच्या मोजणी कार्यक्रमाचा उदघाटन सोहळा झाला. या कार्यक्रमाचे उदघाटक एमएमआरडीए भूसंपादन विरोधी समितीचे अध्यक्ष सुधाकर पाटील यांनी सारडे ग्रामविकास समितीच्या विस्तारित गावाला गावठाण म्हणून मान्यता मिळण्यासाठी च्या प्रयत्नांचे कौतुक केले.

सारडे ग्रामविकास समितीचा गावठाण लढा हा उरण तालुक्यातील गावांना आदर्श ठरेल असे सांगितले. समितीचा ह्या कामी पाठपुरावा व विविध मंत्रालय, जमाबंदी आयुक्त,संबधित महसूल विभागां सोबत केलेल्या पत्रव्यवहार ही समितीची जमेची व कायदेशीर बाजू असल्याचे प्रतिपादन केले.

सारडे ग्रामविकास समितीचे अध्यक्ष मनोज पाटील यांनी समितीच्या पुढील कामाच्या नियोजनाची माहिती दिली. तसेच गावाच्या सीमांकना नंतर घरांचा सर्व्हे हा विस्तारित गावाला गावठाण म्हणून मान्यता मिळण्याच्या कामी महत्वाचे पाऊल असून एमएमआरडीए, एमआयडीसी सारखे शेती, गाव व घरे उद्ध्वस्त करणारे प्रकल्प डोक्यावर टांगते असताना समितीचे कार्य हे अनमोल यथोचित आहे हे आपल्या भाषणात विषद केले.

समितीचे सल्लागार एस.के.म्हात्रे यांनी गावातील, शासकीय नोकरीतून निवृत्त ग्रामस्थांनी आपल्या अनुभव व ज्ञानाचा फायदा गावठाण मान्यतेच्या लढ्यात द्यावा व आपले योग्य उत्तरदायित्व पार पाडावे, असे प्रतिपादन केले. सारडे सरपंच रोशन पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. तसेच सुधाकर पाटील यांनी सारडे ग्रामविकास समितीचे काम अन्य व्यासपीठावरून विषद करावे, अशी विनंती केली.

या कार्यक्रमाचे वेळी समितीचे उपाध्यक्ष संदीप पाटील, खजिनदार प्रितम म्हात्रे, सचिव विशाल म्हात्रे, महेश पाटील, संतोष माळी, सागर पाटील, राज पाटील, भूषण म्हात्रे, शक्ती वर्तक, सन्नी पाटील, आदेश पाटील, देवेंद्र पाटील आदी समितीचे कार्यकर्ते हजर होते. तसेच माजी उपसरपंच श्यामकांत पाटील, जी.आर. म्हात्रे, संपेश पाटील, रोशन पाटील, रोहन पाटील व सर्व्हेर सोमनाथ कोळी व त्यांची टीम हजर होती.

## उरणमध्ये आदिती महोत्सवातून महिला सशक्तीकरण

**उरण : बातमीदार**

स्त्रियांना एकत्र करून त्यांना आत्मनिर्भर, सशक्त बनविण्याच्या दृष्टीकोणातून रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी आदिती महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. अशाच प्रकारचे आदिती महोत्सव उरण तालुक्यातही मोठ्या उत्साहात पहिल्यांदाच साजरे करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा गट)च्या वतीने खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून कॅबिनेट मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनानुसार उरण तालुक्यात एमजी वेअर हाऊस धुतुम येथे भव्य दिव्य स्वरूपात हळदी कुंकू कार्यक्रम घेण्यात आला. सौभाग्याचे वाण या कार्यक्रमात एकमेकांना वाटण्यात आले. अंत्यत उत्साहात हा कार्यक्रम झाला. या वेळी महिलांसाठी लोकगीताचा ऑर्केस्ट्रा, नृत्यअविष्कार, लकी ड्रॉ, पैठणी बक्षिसे, महिलांसाठी भेट वस्तू असे अनेक विविध कार्यक्रम या महोत्सव मध्ये राबविण्यात आले. या सर्व कार्यक्रमांना महिलांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती. हजारो महिलांनी उपस्थित राहून या सर्व कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद लुटला. विश्रांती ताई घरत व चिर्ले सायकल लाभार्थी तर्फे उमाताई मुंढे यांना छोटीसी भेट वस्तु देण्यात आली.



मराठी अभिनेत्री रसिका वेंगुर्लेकर, उमाताई मुंढे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा अध्यक्षा तथा विद्यमान सरपंच वासांबे ग्रामपंचायत), कुंदा वैजनाथ ठाकूर- उरण तालुका महिला अध्यक्षा, वैशालीताई सामंत, रेश्मा रंधिर ठाकूर, रंजना मेघनाथ ठाकुर, उज्वला सुनिल ठाकूर, शमिता दत्ता ठाकुर, मुक्ता लिलाधर घरत, वंदना मनोहर ठाकूर, भारती समाधान कटेकर, प्रणाली प्रवीण घरत, प्रतिज्ञा सागर ठाकूर, वैशाली अरुण ठाकुर, संध्या विक्रम ठाकुर, माजी उपसरपंच धुतुम वैशाली पाटील, सुलोचना पाटील, पिंकी हेमंत घरत, डॉ. रंजना म्हात्रे, उज्वला दीदी, पूजा विशाल पाटील आदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महिला पदाधिकारी कार्यकर्ते, सामाजिक महिला कार्यकर्त्या, मान्यवर या वेळी उपस्थित होत्या.

आदिती महोत्सव यशस्वी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गट)चे सर्वच पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. प्रसिद्ध निवेदक नितेश पंडित सर, श्याम ठाकुर, आकाश घरत (फोटो ग्राफर), तसेच द्रोणागिरी साऊंड सर्विस धुतुम यांचेही मोलाचे सहकार्य या महोत्सवाला लाभले आहे. या महोत्सवाला महिलांचा मोठ्या प्रमाणात उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

### क्लिक...क्लिक...!



**मुरूड : होळी सणाआधी मासेमारीच्या हंगामासाठी सज्ज होताना कोळी बांधव दिसत आहेत. कुणी इंधन भरतंय, तर कुणी जाळी चढवतोय. समुद्रकिनारी एकूणच लगबग सुरू असल्याचे पहावयास मिळत आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## खारघरमध्ये मोफत आरोग्य शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

बजाज लाईफ इंशुरन्स कंपनी वाशी ब्रँच आणि फोरटीज हीरानंदनी हॉस्पिटल वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.९) खारघर सेक्टर ७ येथील सत्याग्रह कॉलेज येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन बजाज लाईफ इंशुरन्स कंपनीचे जनरल मॅनेजर बिपीन नायर यांच्या हस्ते झाले. समाजातील सर्व थरातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या शिबिरात खारघरमधील रहिवाशी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.




बजाज लाईफ इंशुरन्स कंपनीचे रीझनल हेड अमोल माने सर ब्रँच मॅनेजर उषा राणे व पनवेल वाशी युनिटचे सर्व सेल्स मॅनेजर यांच्या बरोबर हिरानंदानी फोरटीज हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी व डॉक्टरांची विशेष टीम यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली असल्याची माहिती समन्वयक मुकेश शिंदे यांनी दिली.

# चित्रलेखा पाटील यांचा शिवसेनेकडून निषेध

## आमदार महेंद्र दळवी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने संताप

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरात क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करण्यासाठी शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील आल्या होत्या. या वेळी त्यांनी आमदार महेंद्र दळवी हे जमीन विकणारे दलाल आहेत. थोड्या दिवसांत ते मुरूड तालुका विकून जातील, अशी घणाघाती टीका केली होती. यावर मुरूड तालुका शिवसेना आक्रमक झाली असून चित्रलेखा पाटील यांच्या वक्तव्याचा त्यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर निषेध केला आहे.



महिला म्हणून शिवसेना आदर करीत आहे, पण यापुढे बेताल वक्तव्य केले, तर मुरूड तालुक्यात फिरू देणार नाही, असा गंभीर इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला.

या पत्रकार परिषदेला शिवसेनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष भरत बेलोसे, संघटक तृप्ती भोसले, दिनेश मिनमिने, मुरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, संघटक यशवंत पाटील, उपप्रमुख मनोज कमाने, प्रवासी संघटना अध्यक्ष बाबू सुर्वे, शिवसैनिक सागर चौलकर, माजी सभापती किशोर धामणस्कर, माजी चेअरमन महेश भगत, जावेद कारभारी, अरविंद गायकर मंदा ठाकूर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बाबू सुर्वे यांनी, आमदारांना दलाल शब्द वापरणे ही शेकापची संस्कृती आहे का? असा सवाल करून ज्या घराण्यात उत्कृष्ट संसदपटू म्हणून माजी आमदार मीनाक्षी पाटील यांचा सन्मान आजही केला जातो त्याच घराण्यातील एका व्यक्तीकडून प्रतिष्ठित आमदाराचा अवमान केला जात असेल, तर यांच्याकडून काय शिकण्यासारखे आहे. या शब्दावरून शेकापची संस्कृती सर्वांना कळत आहे, असे म्हटले.

जिल्हा उपाध्यक्ष भरत बेलोसे यांनी सांगितले की, आमदार महेंद्र दळवी यांनी मुरूड तालुक्याचा मोठा विकास केला आहे. त्यांनी केलेला विकास विरोधकांना दिसत नाही. आमदारांचा अवमान केल्याप्रकरणी आम्ही पोलीस व तहसीलदार यांना निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी करणार आहोत.

तालुका संघटक यशवंत पाटील म्हणाले की, क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनावेळी आमदार महेंद्र दळवी यांचा उल्लेख चुकून आलेले आमदार असा करण्यात आला. यावर सविस्तर माहिती देताना त्यांनी सांगितले की, सर्वात प्रथम आमदार दळवी यांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत नृपाल पाटील यांचा पराभव केला. विधान परिषदेत जयंत पाटील यांचा पराभव, माजी आमदार पंडित पाटील यांचा पराभव व आता आमदार दळवी यांनी चित्रलेखा पाटील यांचा पराभव केला आहे. चार वेळा पराभवाचे पाणी पाजणारा अचानक निवडून कसा येऊ शकतो, असा प्रतिसवाल या वेळी त्यांनी केला.

उपतालुका प्रमुख मनोज कमाने यांनी तीव्र नाराजी व्यक्त करून अशा वादग्रस्त विधानामुळे स्त्रियांची मान खाली जात आहे. आमदारांच्या विकासकामांबाबत बोला, वैयक्तिक बदनामी करणे अयोग्य असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

जिल्हा संघटक तृप्ती पाटील यांनी सांगितले की, चित्रलेखा पाटील यांनी दलाल शब्द मागे घ्यावा; अन्यथा महिला संघटनेकडून मोठे आंदोलन छेडले जाईल. सुपारी संघाचे माजी चेअरमन महेश भगत यांनी म्हटले की, भोईघर येथील सुपारी विकत घेण्याचे षडयंत्र कोण रचत आहे, पूर्वापार सुरू असलेला सुपारी संघ बंद करण्याचे कारस्थान कोण करीत आहे हे लोकांना चांगले ठावूक आहे. शेकापच्या विरोधामुळे अनेक प्रकल्प रायगड जिल्ह्यात येऊ शकलेले नाहीत. आमदार महेंद्र दळवी यांच्यासारखा विकास करून दाखवू शकले नाहीत व आता तुम्हाला त्यांनी केलेला विकास पाहवत नाही.

# ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करावी

## माथेरानमधील हातरिक्षाचालकांची मागणी

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान शहरातील ई-रिक्षा प्रश्न सतत चर्चेला येत असताना आपल्यालासुद्धा लवकरच ई-रिक्षा मिळेल आणि हातरिक्षांच्या अमानवीय प्रथेतून कायमस्वरूपी मुक्ती मिळेल या आशेवर इथला कष्टकरी, श्रमिक हातरिक्षा चालक जगत आहे. त्यामुळे ई-रिक्षांच्या संख्येत वाढ व्हावी, अशी मागणी होत आहे.

अनेक वर्षांच्या पाठपुराव्याने कधी नव्हे, असा बदल माथेरान या दुर्गम पर्यटनस्थळावर पर्यावरणपूरक ई-रिक्षाच्या माध्यमातून पहावयास मिळत असताना जो काही आमूलाग्र बदल घडला आहे. त्यासाठी हातरिक्षा संघटनेचे सचिव प्रा. सुनील शिंदे यांना अनेक अग्निदिव्य पार करावी लागली आहेत.

जवळपास ९४ हातरिक्षाचालकांपैकी आतापर्यंत २० जणांना ई-रिक्षा देण्यात आल्या आहेत. या संख्येत टप्प्याटप्प्याने वाढ होईल, अशी अपेक्षा आहे. पायलट प्रोजेक्ट पूर्ण होऊनसुद्धा ई-रिक्षाच्या संख्येत वाढ झालेली नाही. त्यामुळे कष्टकरी, श्रमिक हवालदिल झाले आहेत.



२० ई-रिक्षा सुरू झाल्यापासून स्वस्त आणि सुरक्षित प्रवास देणारी सुविधा उपलब्ध झाल्यामुळे हातरिक्षांचा वापर सहसा कुणी पर्यटक करताना दिसत नाहीत. त्यामुळे उर्वरित ७४ हातरिक्षाचालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. सुप्रीम कोर्टाने ई-रिक्षा बाबतीत सर्व अधिकार सनियंत्रण समितीकडे सुपूर्द केल्यामुळे ही समिती निर्णय घेईल त्यावर अवलंबून आहे.

> **वाढत्या वयानुसार हातरिक्षांचे अतिकष्टदायक काम करणे माझ्यासह अन्य सहकाऱ्यांनासुद्धा जमत नाही. केवळ नाईलाजाने कुटुंबातील सदस्यांना पोटाची भूक भागविण्यासाठी हातरिक्षा ओढण्याचा व्यवसाय करावा लागत आहे.**
>
> **-किसन वाघेला, हातरीक्षा चालक**

# कर्जतच्या किरवली परिसरात वणवा



**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जतजवळील किरवली येथील डोंगरास वणवा लागल्याने परिसर आगीने धुमसत होता, तर आगीचे धुराचे लोट वर पसरले.

कर्जत तालुक्यात सध्या वणवे लागत असून ते नैसर्गिक आहेत की मानवनिर्मित याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. कर्जत-नेरळ राज्य मार्गावरील किरवली येथील डोंगर टेकडीवर वणवे लागण्याच्या घटना सातत्याने पुढे येत असतानाच सोमवारी (दि. १०) दुपारच्या सुमारास येथील दोन टेकड्या वणव्याच्या भक्ष्यस्थानी पडल्या. हा वणवा सायंकाळी पाच वाजेपर्यंत धुमसत होता.

आज कर्जत तालुक्यातील वनसंपदा असे वणवे लागून नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. जंगलात वन्यप्राणीदेखील संकटात आहेत. सुजलाम् सुफलाम् म्हणून ओळखला जाणारा कर्जत तालुका या संकटामुळे पर्यावरणदृष्ट्या धोक्यात आला आहे. याकडे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देऊन उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# नागोठण्यात मंदिर उभारणी, मूर्ती प्रतिष्ठापना

**नागोठणे : बातमीदार**

नागोठण्यातील श्री चंद्रप्रभस्वामी भगवान मंदिरात अजांशालाका प्राणप्रतिष्ठा सोहळा प्रतिष्ठाचार्य आचार्य श्रीमद् विजय देवकीर्ती सूरीसव महाराज, पन्यास रत्नकीर्ती विजय गणी आदी श्रमण-श्रमणीवृंदाच्या मार्गदर्शनाखाली व अन्य साधू-साध्वी गण यांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात झाला. जैन सकल संघाकडून आयोजित या कार्यक्रमास खासदार सुनील तटकरे यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले.

या कार्यक्रमास श्री चंद्रप्रभस्वामी भगवान मंदिराचे कार्याध्यक्ष किशोर जैन, नरेंद्र जैन, अध्यक्ष प्रकाश जैन, जुगन जैन, श्री जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त समितीचे सचिव भाई टके आदींसह जैन समाज बांधव व भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.



# खुशबूप्रकरणी आरोग्यमंत्री, आदिवासी विकासमंत्र्यांना भेटणार

## आमदार महेंद्र थोरवे यांचे पोलीस मित्र सुरक्षा परिषदेला आश्वासन

**कर्जत : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील तांबडी येथील नामदेव नामदेव ठाकरे यांची नऊ वर्षांची मुलगी खुशबू हिचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणात कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी लक्ष घालावे, अशी मागणी करणारे निवेदन अखिल भारतीय पोलीस मित्र सुरक्षा परिषदेकडून सादर केले. यावर आमदार थोरवे यांनी राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके तसेच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची सोमवारी मुंबई येथे भेट घेऊन रीतसर पत्र देऊन मागणी करणार असल्याचे आश्वासन दिले आहे.



पेण येथील वरवणे शासकीय आश्रमशाळेत शिकणाऱ्या चौथी इयत्तेतील खुशबू ठाकरे हिचा कुष्ठरोगावर उपचार घेत असताना मृत्यू झाला होता. सुदृढ असलेल्या खुशबूला आरोग्य विभागाने कुष्ठरोगी ठरवले व चुकीची औषधे दिल्याने खुशबू हिचा मृत्यू झाला होता, असा आरोप होत आहे. या प्रकरणी दोषी असलेल्या आरोग्य विभाग तसेच शासकीय आश्रमशाळा आणि आदिवासी विभाग यांच्यावर कारवाई करण्याची मागणी पोलीस मित्र सुरक्षा परिषदेने केली आहे.

परिषदेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे आणि प्रदेश अध्यक्ष रतन लोंगले यांनी कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. आपल्या मागण्यांचे निवेदन आमदार थोरवे यांना सादर केल्यानंतर परिषदेने रायगड जिल्हाधिकाऱ्यांना या निवेदनाची प्रत पाठवून दिली आहे.

खुशबू मृत्यूप्रकरणी काय सत्य आहे बाहेर आलेच पाहिजे. नामदेव ठाकरे यांचा काळजाचा तुकडा यंत्रणेच्या चुकीमुळे हिरावून गेला आहे. त्यामुळे या प्रकरणाची उकल व्हावी आणि खुशबूला न्याय मिळावा यासाठी आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके तसेच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची मुंबईत भेट घेणार आहोत. या वेळी खुशबूच्या मृत्यूची चौकशी करण्याची मागणी करणारे निवेदनदेखील देणार असल्याचे आश्वासन आमदार थोरवे यांनी पोलीस मित्र सुरक्षा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

# कोकण विकास समितीची सभा उत्साहात

**चौक : प्रतिनिधी**

कोकण विकास समिती कार्यकारिणी सदस्य व इतर सदस्यांची विशेष सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. या वेळी मागील कामांचा आढावा घेऊन भविष्यातील उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आला.



समितीचे संस्थापक अध्यक्ष जयवंत दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली भविष्यात कोकण विकासावर भर देण्याचे ठरले. समितीच्या प्रस्तावांचा मंत्रालय तसेच इतर शासकीय कार्यालयात पाठपुरावा करण्यासाठी समन्वय प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली. नवीन संकल्पना, योजना, सूचना, बदल याचे नियोजन करण्यासाठी नियोजन प्रमुखांची नियुक्त करण्यात आली.

समिती अंतर्गत कोकण विकास महोत्सव साजरा करताना कला, क्रीडा, संशोधक, नृत्य, कलाकृती, खाद्यसंस्कृती, खाद्य व्यावसायिक, गृह पाहुणचार व्यावसायिक (होम स्टे व्यावसायिक), कोकणची संस्कृती-चालीरिती जनसामान्यांपर्यंत पोहचविणारे व त्यास प्रसिद्धी देणारे, कोकण मेवा, कोकण संस्कृती, कोकणातील भूमी उद्योजक, समाज विकलांग विकास संस्था, कोळी, आदिम, वारली संस्कृती, सामाजिक दिशा देणारे संत इत्यादी विषयांचा अंतर्भाव समिती कार्यक्षेत्रात करता येईल का यावर चर्चा करण्यात आली. मुंबई टाटा मॅरेथॉनच्या धर्तीवर कोकण मॅरेथॉनचे आयोजन करणे यावर चर्चा झाली.

विद्यमान मंत्री, खासदार, आमदार समितीला सहकार्य करीत असल्याचे सदस्यांनी सांगितले.

# वोलक्सवॅगन कंपनीकडून विद्यार्थ्यांना सोलर लॅम्पचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील गरीब व गरजू शालेय विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी माऊंट कार्मेल हायस्कूल येथे वोलक्सवॅगन कंपनीमार्फत सोलर लॅम्पचे वाटप करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासात कोणताही खंड अथवा अडथळा येऊ नये म्हणून १३० सोलर लॅम्प देण्यात आले.


वोलक्सवॅगन कंपनीच्या रौदात अहमद यांच्या हस्ते माऊंट कार्मेल हायस्कूलमध्ये गरीब व गरजू विद्यार्थ्यांना सोलर लॅम्पचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे मॅनेजर रेव्ह फादर बोनवेंचरे, मुख्याध्यापिका ज्युली चांदी, प्रायमरी मुख्याध्यापक सुनील वेगस व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




# जि.प. शाळेच्या विद्यार्थ्यांची भोपाळ येथे सहल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद, केंद्रीय प्रकल्पांतर्गत समग्र शिक्षा २०२४-२५ राष्ट्रीय अविष्कार अभियान राज्याबाहेर शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन मध्य प्रदेशातील भोपाळमधील प्रादेशिक विज्ञान भवन येथे नुकतेच करण्यात आले होते. या सहलीसाठी जिल्हा परिषदेच्या सहा शाळांची निवड करण्यात आली होती. या शाळांमधील ४५ विद्यार्थी सहलीत सहभागी झाले होते.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सहल झाली. राष्ट्रीय अविष्कार अभियान राज्याबाहेर शैक्षणिक अभ्यास सहलीत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमात जिल्ह्यात प्रथम व विभागात द्वितीय पुरस्कार प्राप्त रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, खालापूर तालुक्यातील वडगावचे आठ विद्यार्थी, पनवेल तालुक्यातील तळोदे पाचनंद उच्च प्राथमिक शाळेचे चार विद्यार्थी, पेणच्या खारपाडाचे उच्च प्राथमिक शाळेचे सहा विद्यार्थी, उरणच्या खोपटे येथील उच्च प्राथमिक शाळेचे आठ विद्यार्थी, कर्जत तालुक्यातील माथेरान येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल विद्यामंदिरचे १३ विद्यार्थी, पिंगळस शासकीय आश्रमशाळेचे सहा विद्यार्थी असे एकूण ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

वडगाव शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांची या सहलीसाठी नोडल अधिकारी म्हणून, तर पेणच्या सुषमा धुर्वे यांची व्यवस्थापक म्हणून नियुक्ती जिल्हा परिषदेकडून करण्यात आली होती. त्यांच्यासोबत संतोष चाटसे, नंदिनी कदम, विभावरी सिंगासने, अमृता तोडकर, सिमा डोंगरे यांचा सहभाग होता.

सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना भोपाळ येथील प्रादेशिक विज्ञान केंद्र, इंदिरा गांधी राष्ट्रीय मानव संग्रहालय, आदिवासी जनजाती म्युझियम, वनविहार प्राणी संग्रहालय, नौकानयन, राजा भोज तलाव, ताज उल मस्जिद, मोती मस्जिद, कर्करेषा, सांची स्तूप, पीपल्स मॉल व भीमबेटका या स्थळांची भेट व अभ्यास करण्याची संधी मिळाली. प्रादेशिक विज्ञान भवनात तारामंडल रचना, निर्मिती यावर शो दाखवण्यात आला. प्रेक्षणीय स्थळे व पर्यटनाचा आनंद मुलांनी लुटला. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनीता गुरव यांनी व्हिडीओ कॉल करून विद्यार्थ्यांशी संवाद साधत सहलीबाबत मार्गदर्शन केले.

# रेवदंड्यातील पांचाळेश्वर देवस्थानचा उत्सव

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बाजारपेठेतील मुख्य रस्त्यालगत असलेले प्राचीन श्री पांचाळेश्वर देवस्थानचा उत्सव धार्मिकतेने व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यामध्ये भाविक सहभागी झाले होते. पुरातन व जागृत देवस्थान असलेले पांचाळेश्वर देवस्थान उत्सवाचे आयोजन सोमवारी (दि.१०) रेवदंडा, थेरोंडा, चौल दैवज्ञ ब्राम्हण समाजाच्या वतीने करण्यात आले होते. सालाबादप्रमाणे या वर्षीही ठिकठिकाणाहून दैवज्ञ ब्राम्हण समाज बांधव व भगिनी उत्सवासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पांचाळेश्वर देवस्थान येथे सकाळी पूजा व अभिषेक, मुखवटा मिरवणूक, दुपारी महाआरती, महाप्रसाद, सायंकाळी लहान मुलांचे फनीगेम्स, रात्री बक्षीस व सत्कार समारंभ, रात्री मनोरंजनार्थ कार्यक्रम झाला.

सोहळा यशस्वी करण्यासाठी दैवज्ञ ब्राम्हण समाजाचे अध्यक्ष देवानंद पोवळे, उपाध्यक्ष अक्षय तळेकर, खजिनदार नितेश पोवळे, सचिव ओमकार नागावकर, विश्वस्त दीपक तळेकर, महिला अध्यक्ष स्वाती जोमराज यांच्यासह समाज बांधव व भगिनींनी परिश्रम घेतले.



# मुंबई संघाची ‘रणजी’च्या उपांत्य फेरीत धडक

## अजिंक्य रहाणे, शार्दुल ठाकूर विजयाचे हीरो

**कोलकाता : वृत्तसंस्था**

रणजी ट्रॉफीमधील चॅम्पियन संघ मुंबईने रणजी ट्रॉफी २०२४-२५च्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील मुंबई संघाने उपांत्यपूर्व फेरीत हरियाणाचा १५३ धावांनी पराभव केला.

कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर झालेल्या या सामन्याच्या चौथ्या दिवशी मुंबईच्या दुसऱ्या डावात कर्णधार अजिंक्य रहाणेने शानदार शतक झळकावले. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत रहाणे ८८ धावांवर खेळत होता आणि त्यानंतर चौथ्या दिवसाच्या सुरुवातीलाच त्याने आपले शतक पूर्ण केले.

प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या मुंबईने ३१५ धावा




केल्या होत्या. प्रत्युत्तरात हरियाणाच्या संघाने ३११ धावा केल्या. हरियाणाचा कर्णधार अंकित कुमार याने १६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, ज्याला शम्स मुलानीने बाद केले, पण शार्दुल ठाकूरच्या भेदक गोलंदाजीपुढे हरियाणाचा निम्मा संघ तंबूत परतला. शार्दुलने १८.५ षटकांत ५८ धावा देत सहा विकेट्स घेतल्या, तर शम्स मुलानी आणि तनुष कोटियनने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

१४ धावांची आघाडी घेत मुंबईच्या संघाने दुसऱ्या डावात फारशी चांगली सुरूवात केली नाही आणि ५० धावांत २ विकेट्स गमावले. यानंतर अजिंक्य रहाणेने सूर्यकुमार यादवच्या मदतीने संघाचा डाव उचलून धरला. गेल्या सामन्याचा शतकवीर सिद्धेश लाड ४३ धावांची शानदार खेळी करत बाद झाला, तर गेल्या काही आंतरराष्ट्रीय सामन्यात फ्लॉप ठरलेल्या सूर्यकुमार यादवला सूर गवसला आणि त्याने आठ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ७० धावांची वादळी खेळी केली.

सूर्यकुमार यादव बाद झाल्यानंतर अजिंक्य रहाणेने शिवम दुबेबरोबर भागीदारी रचली आणि आपले ४१वे प्रथम श्रेणी शतकही झळकावले. रहाणेने १३ चौकारांच्या मदतीने १८ धावांची खेळी केली, तर दुबे एक षटकार आणि सहा चौकारांसह ४८ धावा करून बाद झाला. यानंतर हरियाणाने कमबॅक करत मुंबईला ३३९ धावांवर सर्वबाद केले. तेव्हा मुंबईकडे ३५४ धावांची आघाडी होती. विजयाच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हरियाणाचा डाव २०१ धावांमध्ये संपुष्टात आला आणि मुंबईने बाजी मारली.

# राज्य शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय पुणे यांच्या कार्यक्रमांतर्गत अकोले येथे क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित शालेय राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी यश मिळविले.

१७ वर्षाआतील मुलींच्या ४३ किलो वजनी गटात गायत्री महेश बडेकर (आर्चिड कॉलेज कशेळे, कर्जत) हिने सुवर्णपदक प्राप्त केले. तिने स्ट्राँग वूमन हा किताब पटकाविला. ४७ किलो वजनी गटात जान्हवी चंद्रकांत थोरवे (केईएस, कर्जत) हिने रौप्यपदक प्राप्त केले. १९ वर्षाआतील मुलींच्या ४३ किलो वजनी गटात अचल नवीन राजभर (अभिनव ज्ञानमंदिर, ज्युनियर कॉलेज, कर्जत) हिने सुवर्णपदक प्राप्त केले. ६३ किलो



वजनी गटात वैष्णवी गणेश गंगावणे (अभिनव ज्ञानमंदिर, ज्युनियर कॉलेज, कर्जत) हिने सुवर्णपदक पटकावले.

गायत्री बडेकरला राष्ट्रीय वेटलिफ्टिंग पॉवरलिफ्टिंग खेळाडू हनुमंत खरात यांचे मार्गदर्शन लाभले, तर अभिनव कॉलेजच्या खेळाडूंना नवनाथ दाभाडे यांचे मार्गदर्शन आणि धनश्री कानडे यांचे सहकार्य लाभले.

या यशाबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, सदस्य संदीप पाटकर, कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल, मानस कुंटे यांनी आनंद व्यक्त केला आणि आगामी काळातील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. याचबरोबर रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र अंतनूर, अंकिता मयेकर यांनीसुद्धा आनंद व्यक्त केला आहे.




# ब्राह्मण सभा प्रीमियर लीगमध्ये ‘वैद्य वॉरियर्स’ अजिंक्य

**कर्जत : प्रतिनिधी**

भगवान श्री परशुराम जयंतीनिमित्त सर्व शाखीय ब्राह्मण सभेच्या वतीने ब्राह्मण प्रीमियर लीग अंतर्गत कर्जत मध्ये क्रिकेटचे सामने आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये वैद्य वॉरियर्स संघ अजिंक्य ठरला.

बामचा मळा येथील मैदानावर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी दीपक बेहेरे, रंजन दातार, डॉ. उपेंद्र सुगवेकर, भालचंद्र जोशी, योगेश साठे, सुनील गोगटे, प्रदीप गोगटे, महेश वैद्य, निखिल थत्ते, जयंत लेले, महेंद्र तेरेदेसाई, ॲड. अजय मेंढी, प्रवीण गांगल, ॲड. प्रज्ञेश खेडकर, श्रीकांत सहस्त्रबुद्धे, राहुल जोशी, पराग कारूळकर यांनी विशेष सहकार्य केले.

स्पर्धेत सहा संघाचा सहभाग होता. द्वितीय क्रमांक जय श्री परशुराम संघ, तृतीय कुलकर्णी मंडप यांनी मिळवले.

स्पर्धा आयोजनाची धुरा ऋषिकेश दातार, सार्थक घरलुटे, दिलीप गोगटे, तुषार जोशी, योगेश साठे, निखिल थत्ते, देवेन कुलकर्णी, प्रथमेश कानडे, दिपंकर सालये, विशाल जोशी, परीक्षित देशपांडे, अथर्व कारूळकर यांनी सांभाळली.

# झेन चॅम्पियन्स संघ एमपीएलचा मानकरी

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील खान मोहल्ला येथील युवकांच्या वतीने मोहल्ला प्रीमियर लीगच्या शीर्षकाखाली बॉक्स क्रिकेट सामन्यांचे आयोजन नुकतेच नगर परिषदेच्या मैदानावर करण्यात आले होते. यामध्ये झेन चॅम्पियन संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत मोहल्ल्यातून सात संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये झेन चॅम्पियन, मायरा स्टार, कायनात नाईट रायडर्स, नॉक फिनिश, ओया हसनैन इंडियन्स, सेवन स्टार आणि अनिस रॉयल्स या संघांचा समावेश होता. या वेळी क्रिकेटरसिकांनी उपस्थिती दर्शविली.

झेन चॅम्पियन संघाचा मालक अतिक पठाण व खेळाडूंना रोख एक लाख ५० हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले. या वेळी युवा नेते ललित पाटील यांनी उपस्थित राहून सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

रनर अप मायरा स्टार संघ (रोख रक्कम ७५ हजार व चषक), द्वितीय





क्रमांक ओया हसनैन इंडियन्स संघ (रोख रक्कम ५५ हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांक ७ स्टार संघाने (रोख रक्कम ४५ हजार रुपये व चषक) मिळविला. या वेळी भाऊ मुजावर व त्यांचे सहकारी तसेच संघमालक मोहसीन तांडेल, अतिक पठाण, रफिक झटाम, रमीझ पठाण, मोहसिन खोत, अनिस बोरी आणि जोएब मुजावर हे संघ मालक उपस्थित होते.

या सामन्यात मालिकावीर म्हणून झेन चॅम्पियन संघाचा शहेबाज बांगी, उत्कृष्ट फलंदाज मायरा स्टार संघाचा शकील खान, उत्कृष्ट गोलंदाज ओया हसनैन इंडियन्स संघाचा अकदस खोत आणि उकृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून नॉक फिनिश संघाचा आसिफ अखवारे यांना गौरविण्यात आले.

# जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत करावी, पनवेल संघ अजिंक्य





**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने जय भवानी वाशी, वरसुआई वाशी, वैकुंठ पाटील मित्र मंडळ यांच्या विद्यमाने पेण तालुक्यातील वाशी येथील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर पुरुष व महिला गट रायगड जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये पुरुष गटात नवतरुण करावी, तर महिला गटात कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल संघाने अजिंक्यपद पटकाविले.

पुरुष गटातील अंतिम सामना नवतरुण करावी पेण विरुध्द जय हनुमान धेरंड अलिबाग या संघात झाला. मध्यांतराला करावी व धेरंडमध्ये अत्यंत चुरशीच्या झालेल्या या सामन्यात करावी संघाने धेरंड संघाचा चार गुणांनी पराभव करून जिल्हा अजिंक्यपद मिळविले.

महिला गटाचा अंतिम सामना कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल विरुध्द पनवेल स्पोर्ट्स पनवेल या संघात झाला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यात कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल संघाने दोन गुणांनी विजय मिळवित महिला गटाचे अजिंक्यपद मिळविले.

या स्पर्धेत ततीय क्रमांक श्री गणेश दिवलांग, चतुर्थ क्रमांक मातुछाया कुर्डूस; तर महिला गटात ततीय क्रमांक भिलेश्वर किहीम व चतुर्थ क्रमांक ओमकार वेश्वी या संघाने प्राप्त केला.

या स्पर्धेचे पारितोषक वितरण स्पर्धा संयोजन समितीचे स्वागताध्यक्ष वैकुंठ पाटील, शर्मिला पाटील, सचिव मिलिंद पाटील, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कबड्डी स्पर्धेला कॅबिनेट मंत्री भरत गोगावले, खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील, मंत्री आदिती तटकरे, आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रवीण दरेकर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र दळवी, आमदार निरंजन डावखरे, आस्वाद पाटील, चित्रा पाटील आदी अनेक राजकीय नेत्यांनी भेट दिली.

# ...अन् आफ्रिकेचे कोच खेळाडूच्या जागी फिल्डिंगसाठी मैदानात उतरले

**कोलकाता : वृत्तसंस्था**

सध्या दक्षिण आफ्रिकेचा संघ पाकिस्तानच्या दौऱ्यावर आहे, जिथे तो तिरंगी मालिका खेळत आहे. या मालिकेत १० फेब्रुवारीला लाहोरमध्ये न्यूझीलंडविरूद्ध सामना खेळवला गेला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ३०४ धावा केल्या. प्रत्युत्तरात आफ्रिकेचा संघ धावसंख्येचा बचाव करण्यासाठी मैदानात उतरला तेव्हा त्या वेळी मैदानावर दृश्य आश्चर्यचकित करणारे होते. आफ्रिकेचे कोच मैदानात क्षेत्ररक्षण करण्यासाठी उतरले होते.

दक्षिण आफ्रिकेचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक वांडिले ग्वावू न्यूझीलंडविरूद्ध सामन्यात मैदानावर क्षेत्ररक्षण करताना दिसले. दक्षिण आफ्रिकेच्या संघाशी संबंधित ही पहिलीच घटना नाही, कारण याआधी त्यांचे फलंदाजी प्रशिक्षकही मैदानावर उतरले होते.

चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी महत्त्वपूर्ण अशा सामन्यात खेळाडूंऐवजी आफ्रिकेचे फिल्डिंग कोच मैदानावर क्षेत्ररक्षण करण्यासाठी का उतरले, असा प्रश्न सर्वांना पडला आहे. लाहोरमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला खेळाडूंची कमतरता भासत असल्याने संघाला हा निर्णय घ्यावा लागला.

दक्षिण आफ्रिकेचे अनेक खेळाडू पाकिस्तान दौऱ्यावर संघासह आलेले नाहीत, कारण ते एसए-२० लीगमध्ये खेळत होते. दक्षिण आफ्रिकेचा संघ केवळ १२ खेळाडूंसह पाकिस्तानला पोहचला. त्यापैकी सहा खेळाडू पूर्णपणे नवखे आहेत. अशा स्थितीत न्यूझीलंडच्या डावाच्या ३७व्या षटकात दक्षिण आफ्रिकेला खेळाडूंची कमतरता भासल्याने क्षेत्ररक्षण प्रशिक्षक वँडिले ग्वावू यांना मैदानात उतरावे लागले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यातील सामन्यात न्यूझीलंड संघाने सहा विकेट्सने शानदार विजय मिळवला.

# विराटची गळाभेट घेणारी ती मिस्ट्री लेडी कोण?

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली हा फिल्डशिवाय फिल्ड बाहेरील गोष्टींमुळेही नेहमीच चर्चेत असतो. त्याची एक झलक पाहण्यासाठी चाहते ‘विराट’ गर्दी करतात. आता विराटचा विमानतळावरील एक व्हिडिओ व्हायरल होताना दिसतोय. ती मिस्ट्री लेडी कोण, अशी चर्चा सध्या सुरू आहे.

इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यानंतर भारतीय संघ भुवनेश्वर विमानतळावर अहमदाबादला जाण्यासाठी पोहचला होता. भारतीय संघातील खेळाडूंसह कोहलीची झलक पाहण्यासाठी एअरपोर्टवरील सर्वांच्या नजरा भिरभिरत होत्या. कडक सुरक्षेत विराटने चेक-इन करण्यासाठी एन्ट्री मारली. त्याला पाहण्यासाठी विमानतळावर गर्दी जमली होती. त्या गर्दीत असलेल्या एका महिलेची विराटने गळाभेट घेतल्याचा सीन पहायला मिळाला. त्या महिलेशी अगदी थोडक्यात संवाद साधत विराट आपल्या दिशेने निघून गेला. आता ती मिस्ट्री लेडी कोण? असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

# जिम्नॅस्टिक्समध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंचा ‘सुवर्ण’ षटकार

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील १५वा दिवस गाजवला

**डेहराडून : वृत्तसंस्था**

जिम्नॅस्टिक्समध्ये सुवर्णपदकांचा षटकार झळकवित महाराष्ट्राने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील १५वा दिवस गाजविला. अक्रोबॅटिक प्रकारात तालबद्ध, सुरबद्ध आणि अचंबित करणाऱ्या रचना सादर करुन चार सुवर्णपदकांसह एक रौप्य अशी पाच पदकांची लयलूट करीत केली. पाठोपाठ रिदमिक्समध्ये सांघिक सुवर्ण व ट्रॅम्पोलिन वैयक्तिक प्रकारात एक सुवर्ण आणि एका रौप्य पदकाची कमाई केली. जिम्नॅस्टिक्समधील यशाने ३८ सुवर्ण पदकांसह पदकतक्यात महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर आहे.





भागीरथी क्रीडा संकुलात सुरू असलेल्या स्पर्धेत महाराष्ट्राचा बोलबाला दिसून आला. अक्रोबॅटिकमध्ये महाराष्ट्राने महिला दुहेरी, मिश्र दुहेरी, पुरुष सांघिक गट व महिला तिहेरी या चार गटात सुवर्णपदके जिंकली. या प्रकाराच्या पुरुष दुहेरीत महाराष्ट्राच्या जोडीला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. रिदमिक्स प्रकारात महाराष्ट्राने सांघिक गटात नेत्रदीपक आणि अचंबित करणाया रचना सादर करुन सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. संयुक्ता काळे, किमया कार्ले, परिणा मदनपोत्रा व शुभश्री मोरे या महिला चौकडीने एकूण २३९.०५ गुणांची कमाई करीत महाराष्ट्राला हे सोनेरी यश मिळवून दिले.

ट्रॅम्पोलिन प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी वैयक्तिक प्रकारात एक सुवर्ण आणि एका रौप्यपदकाची कमाई केली. पुरुषांच्या वैयक्तिक गटात छत्रपती संभाजीनगरच्या आयुष मुळे याने सर्वाधिक ४८.७४ गुणांची कमाई करीत महाराष्ट्राला सुवर्णपदक जिंकून दिले. गतवर्षी या स्पर्धेत कांस्यपदकावर समाधान मानावे लागलेल्या आयुषने या वेळी सुवर्णपदकाला गवसणी घातली.

सर्व पदक विजेत्यांचे पथकप्रमुख संजय शेटे, उप पथकप्रमुख स्मिता शिरोळे यांनी क्रीडा संकुलात उपस्थित राहून अभिनंदन केले. जिम्नॅस्टिक्समधील या यशाने अव्वल स्थानाकडे महाराष्ट्राची वाटचाल सुरू झाली असल्याचे पथकप्रमुख संजय शेटे यांनी सांगितले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com